दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...
www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com ▶ RNI No.MAHMAR/2019/79184
नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित
▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : ३५ वा ▶ रविवार दि. १० डिसेंबर २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

खुशखबर... खुशखबर...
खास लोकांच्या आग्रहास्तव
न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स, धुळे
पार्सल सेवा व रिटर्न बुकींग उपलब्ध
धुळे ते नागपुर, अमरावती, अकोला
स्लिपर कोच २X१ नॉन एसी बस
रात्री १०.३० वाजेला

संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

## न्यूज कॉलम

### क्रूझरच्या धडकेत तरुण जागीच ठार

**धुळे ।** भरधाव क्रूझरने समोरून येत असलेल्या वाहनास दिलेल्या धडकेत तरुण चालक जागीच ठार, तर प्रवासी महिला जखमी झाली. ६ डिसेंबरला सायंकाळी धुळे ते चाळीसगाव रोडवरील जुनवणे (ता. धुळे) गावानजीक हा अपघात झाला. जितेंद्रसिंग गोवर्धनसिंग गोयल (वय ३६, रा. देवास, मध्यप्रदेश) असे मृताचे नाव आहे. तो त्याच्या ताब्यातील वाहन (एमपी ०९ डब्ल्यूएम ५४६३) घेऊन जात होता. त्यादरम्यान समोरून भरधाव येणाऱ्या क्रूझर (एमपी ०९ बीई ०५८२) ने चालकाने त्याच्या वाहनास समोरून जोराची धडक दिली. त्यात जितेंद्रसिंगच्या डोक्याला जबर मार बसून तो जागीच ठार झाला.

### तरुणाला मारहाण; २२ जणांवर गुन्हा

**साक्री ।** तालुक्यातील जैताणे गावात संशयातून तरुणास बेदम मारहाण करीत जखमी केल्याप्रकरणी २२ जणांवर ठाण्यात गुन्हा दाखल झाला. याबाबत समाधान भाऊराव महाले याच्या जैताणे ग्रामीण रुग्णालयात असताना गावातील सनी त्र्यंबक बोरसे, प्रमोद नानाभाऊ पेंढारे, भूषण भरत बच्छाव, प्रवीण बाविस्कर, संकेत बच्छाव, आकाश पावबा धनगर व अन्य दहा ते १५ जणांनी त्यांच्या घरातील मुलीस पळवून नेलेल्या मुलास भेटायला गेल्याच्या संशय घेतला. त्यावरून जातीवाचक शिवीगाळ करीत हाताबुक्क्यांनी मारहाण केली.

# धुळे-नरडाणा जर मनमाड-इंदूरचा भाग असेल तर मी राजकारण सोडून देईल

### माजी आ.अनिल गोटेंचं विरोधकांना आव्हान

**धुळे । प्रतिनिधी**

धुळे-नरडाणा जर मनमाड-इंदूर रेल्वेमार्गाचा भाग असेल तर मी राजकारण सोडून देईल असे थेट आव्हान देत धुळे शहराचे माजी आमदार अनिल गोटे यांनी मनमाड-इंदोर रेल्वेमार्गाच्या विर्रोधकांच्या दाव्यातील हवा काढण्याचा प्रयत्न केलाय. शनिवार दिनांक ९ डिसेंबर रोजी गुलमोहर शासकीय विश्रामगृहात घेतलेल्या पत्रकार परिषदेत अनिल गोटे यांनी विरोधकांना हे आव्हान दिल.

यावेळी गोटे यांचं सडेतोड आक्रमक रुप पुन्हा पहायला मिळालं. दरम्यान एमआयडीसी फेज दोन मध्ये ट्रान्स्पोर्ट हब आणि ड्रायपोर्ट हबची उभारणी करुन एक लाख बेरोजगारांना स्थानिक पातळीवर काम मिळणार असून हे काम लवकरच मार्गी लागणार असल्याचे अनिल गोटे यांनी सांगितले. रावेर ता.धुळे येथील भुखंडावर एमआयडीसी फेज दोनच्या उभारणीबाबत गोटे यांनी माहिती दिली. मनमाड-इंदुर रेल्वेमार्गाचा प्रश्र्न पत्रकारांकडून विचारला गेल्यावर हा रेल्वेमार्ग होणे म्हणजे आकाशातील तारे तोडण्यासारखे आहे. मनमाड-इंदुर रेल्वेमार्गाची वाट लावण्यात आली असून हा मार्ग झाला नाही म्हणून दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडॉर म्हणजेच डीएमआयसी झाला नसल्याचे ते म्हणाले. धुळे तालुक्यातील रावेर शिवारात १८०० एकर जागा आहे. एमआयडीसी फेज दोनसाठी गेल्या २० वर्षांपासून मी प्रयत्न चालविले होते. परंतु एमआयडीसी येणार असल्याचे पाहून काही राजकीय नेत्यांनी तेथील जमिनी खरेदी केल्या. त्यानंतर एमआयडीसी होणार असल्याने या नेत्यानी नुकसान भरपाईची मागणी केली. जागा सरकारची असताना नस्ते उद्योग करुन, ती बळकावली आणि वरुन भरपाईची मागणी झाली. याप्रकरणी हरकती दाखल झाल्या. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या कामाला मान्यता दिली असून जमिन केंद्राकडे हस्तांतरणाबाबत राज्य सरकारमधील उद्योगमंत्री उदय सामंत यांना फोन केला होता. ना. उदय सामंत यांची मी भेट घेतली असता ना.गडकरींनी मला एमआयडीसी फेज दोनबाबत फोन केला होता. पुढील आठवड्यात माझ्या मंत्रालयाकडून नाहरकत दाखला दिला जाईल असे सांगितल्याचे गोटे म्हणाले. एमआयडीसी फेज दोनच्या माध्यमातून धुळे जिल्ह्यातील १ लाख बेरोजगारांना स्थानिक पातळीवर काम मिळेल. बेरोजगारीचा प्रश्र्न सुटणार असल्याने ना.गडकरी आणि राज्याचे उद्योगमंत्री सामंत यांचे गोटेंनी आभारही मानले आहेत.



**आमची भुमीका गप्प राहण्याची**

**महापालिकेकडून धुळेकरांना मालमत्ता कराच्या नोटीसा दिल्या जात आहेत, अव्वाच्या सव्वा मालमत्ता कराची आकारणी केली गेल्याची जनभावना आहे. मालमत्ता कर प्रश्र्नी आपली व आपल्या पक्षाची भुमीका काय अशी विचारणा केली असता माजी आ.गोटे म्हणाले की, महापालिकेत जोपर्यंत लोकनियुक्त प्रतिनिधी आहेत तोपर्यंत मी काहीही बोलणार नाही. ही माझी आणि माझ्या पक्षाची भुमीका आहे. कारण मी जर आता बोललो तर अनिल गोटे विकासाच्या आड येतो, अशा बोंबा सुरु होतील. त्यामुळे लोकनियुक्त प्रतिनिधी मनपात असेपर्यंत आमची भुमीका गप्प राहण्याची आहे.**

# राज्यात राष्ट्रवादीचे दोन गट; पण धुळ्यात कार्यकर्त्यांना एकीचा संदेश

**धुळे । प्रतिनिधी**



राज्यात एकीकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शरद पवार गट आणि अजित पवार गट एकमेकांच्या विरोधात उभे असताना धुळ्यात मात्र, शरद पवार गट आणि अजित पवार गटाच्या पदाधिकार्यांनी एकत्र येत दोघांनी राष्ट्रवादी भवन दोन्ही गटांसाठी खुले करण्याचा निर्णय सामंजस्याने घेतला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अजित पवार यांच्या सूचनेनुसार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांच्या आदेशाने, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस तथा धुळे जिल्हा निरीक्षक अर्जुन टिळे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दोन्ही गटांचे जिल्हाध्यक्ष सुरेश सोनवणे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष सारांश भावसार, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुमित पवार व शरद पवार गटाचे शहर जिल्हाध्यक्ष रणजितराजे भोसले या पदाधिकार्यांच्या समन्वयातून धुळे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस भवन उघडण्यात आले. कोणत्याही खाजगी कार्यालयापेक्षा धुळे राष्ट्रवादी काँग्रेस भवन हे जिल्ह्यातील प्रत्येक कार्यकर्त्याचं अस्मितेचं प्रतिक आहे. धोरणात्मक निर्णय सद्यस्थितीत वेगळे असले तरी याचा परिणाम सामाजिक हित व जबाबदारीचे विकेंद्रिकरणांवर होऊ नये यासाठी दोन्ही गटाच्या प्रमुखांनी घेतलेली सामजंस्याची भुमिका चर्चेचा विषय ठरली आहे. आहे. यावेळी अजित पवार गटाचे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष सुमित पवार, शरद पवार गटाचे युवक शहर जिल्हाध्यक्ष वाल्मीक मराठे, शरद पवार गटाचे अल्पसंख्यांक सेलचे प्रदेश उपाध्यक्ष रईस रफुद्दीन काझी, शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष यशवंत डोमाळे आदी उपस्थित होते.

# नीलम नव्हे त्या 'विलनताई': संजय राऊतांचा हल्लाबोल

**मुंबई ।** नीलमताई नव्हे तर त्या विलनताई आहे. जे शिवसेनेला सोडून गेले त्यांचे नावही काढू नका, असा घणाघात ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी केला. ते पुण्यात आयोजित ठाकरे गटाच्या सभेत बोलत होते. तर पुढे बोलताना त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवरही जोरदार हल्लाबोल केला. फडणवीस तुम्ह आम्हाला शिल्लक सेना म्हणून हिनवता, पण लक्षात ठेवा, येणाऱ्या निवडणुकीनंतर तुम्ही क्षुल्लक देखील राहणार नाहीत. या मेळाव्याला ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी देखील मार्गदर्शन केले.

# जरांगे म्हणजे अकलेने दिव्यांग झालेला माणूस : छगन भुजबळांचा हल्लाबोल

**मुंबई । प्रतिनिधी**

मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, राज्यात अशांतता कोण निर्माण करत आहे. राज्यात कायदा सुव्यवस्था आहे की नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. आंतरवाली सराटीत महिला पोलिसांवर हल्ला झाला. त्यानंतर पोलिसांनी तेथील लोकांनी बचावत्मक कारवाई केली. जमाव हिंसक झाला तेव्हा पोलिसांनी वाजवी बळाचा वापर केला, असे फडणवीस म्हणाले.



मी दोन महिन्यांपासून सांगत होतो. पण कोणी ऐकायला तयार नाही. एवढी सहानुभूती मिळाली नसती. या राज्यात अशांतता कोण माजवते? असा प्रश्र्न भुजबळांनी उपस्थित केला.

भुजबळ पुढे बोलताना म्हणाले की, हा तो तर म्हणतो की,(मनोज जरांगे) सर्वांना सरसकट प्रमाणपत्र द्या, मराठ्यातील अन्य नेते गप्प का, बोलाना? हर्षवर्धन पाटील यांना कुणबी प्रमाणपत्र हवं का, यासह अन्य नेत्यांना कुणबी प्रमाणपत्र हव का ? आमचा विरोध झुंडशाहीला आहे, मराठा समाजाला आमचा विरोध नाही, असे छगन भुजबळ म्हणाले.

मराठ्यांना कुणबी सर्टिफिकेट देणं ताबडतोब थांबवा, अशी मागणी मंत्री छगन भुजबळ यांनी इंदापूर येथील सभेत केली.

# बसच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**नंदुरबार । प्रतिनिधी**

शहराजवळच असलेल्या अंकलेश्र्वर- बऱ्हाणपूर महामार्गावरील बालाजी पेट्रोलपंप समोर गुजरात राज्य परिवहन महामंडळाच्या बसने दुचाकीस दिलेल्या धडकेत दुचाकीवरील महिलेचा मृत्यू झाला. अवंतिका कलाल असे मृत महिलेचे नाव आहे.

दरम्यान या रस्त्यावर यापूर्वी देखील अनेक अपघातांचा घटना घडून अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. तळोद्यातील शनी गल्लीत राहणारे अभिजित किसनसा कलाल व त्यांची पत्नी अवंतिका कलाल हे कामानिमित्ताने दुचाकीने चिनोदा चौफुली मार्गे नंदुरबारकडे जाण्यासाठी निघाले. शहरापासून जवळच असलेल्या अंकलेश्र्वर-बऱ्हाणपूर महामार्गावर असलेल्या बालाजी पेट्रोल पंपासमोर त्यांची दुचाकी आली असता गुजरात राज्य परिवहन महामंडळाच्या बसने (क्रमांक जीजे १८ झेड ८५०९) त्यांचा दुचाकीला जोरदार धडक दिली. त्यात बसचा मागील भाग दुचाकीला लागल्यामुळे तोल जाऊन दोघे पती-पत्नी दुचाकीवरून खाली रस्त्यावर कोसळले.

# पायाखाली तुडवायला वेळ लागणार नाही : मनोज जरांगेंचा पुढाऱ्यांना इशारा

**मुंबई । प्रतिनिधी**

आम्ही मोठे केलेले नेते आमच्याच विरोधात जात असतील तर त्यांना पायाखाली तुडवायला वेळ लागणार नाही, असा निर्वाणीचा इशारा मराठा आरक्षणाचे रान पेटवणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांनी राजकारण्यांना दिला आहे.

मराठा आरक्षणाच्या मुद्यावर सरकार काय करत आहे? हा विषय किती बारकाईने हाताळत आहे? यावर आमची करडी नजर



आहे. २४ डिसेंबरपर्यंत हा विषय मार्गी निघेल असा आम्हाला विश्र्वास आहे. सरकारने या प्रकरणी चालढकल केली, तर मराठा समाज नेत्यांना आपल्या दारालाही शिवू देणार नाहीत. आम्ही मोठे केलेले नेते आमच्याच विरोधात जात असतील तर त्यांना पायाखाली तुडवायला वेळ लागणार नाही, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले. आमच्यासाठी आमच्या लेकरांचे भविष्य महत्त्वाचे आहे. आम्ही २४ डिसेंबरपर्यंत वाट पाहू. त्यानंतर मराठा काय असतो हे आम्ही त्यांना दाखवून देवू. थोडा धीर रा. तुम्ही विषय का घेत नाही? याकडे आमचे बारीक लक्ष आहे. माझा समाज गरीब असला आणि शेतात राबत असला तरी त्यांची आपण निवडून दिलेले लोक अधिवेशनात कोणती भूमिका घेत आहेत याकडे त्यांचे लक्ष्य आहे.

# ग्रामीण मतदारसंघासाठी ६९ कोटींच्या निधीची तरतूद

### खासदार डॉ.भामरे यांनी दिली माहिती

**धुळे । प्रतिनिधी**

लोकसभेच्या धुळे मतदारसंघातील धुळे ग्रामीण विधानसभा मतदारसंघात पाठपुराव्यांअंती १४ रस्त्यांसह अन्य कामांसाठी ६९ कोटी ५० लाखांचा निधी मंजूर झाल्याची माहिती खासदार डॉ. सुभाष भामरे यांनी दिली. मंजूर निधीतून सात ते देशशिरवाडे- अजनाळे-पाडळदे-रावेर-चितोड-धुळे-बिलाडी-हिवरखेडा रस्त्यांतर्गत काही भागाचे सिमेंट - काँक्रिटीकरण, दुतर्फा फुटपाथसह सिमेंट -काँक्रिट गटार, पथदीप, चितोडजवळ लहान पूलासाठी ८ कोटी रुपये, राज्य महामार्ग २११ ते मोरदड- मोरदड तांडा- कुंझर रस्त्याच्या काही भाग मजबुतीकरणासह सुधारणांसाठी ८ कोटी.



आर्वी-शिरूड-तरवाडे-भडगाव-नगरदेवळा रस्त्याची सुधारणा करणे ८ कोटी, राज्य महामार्ग ६० ते लोणकुटे-कापडणे-न्याहळोद-जापी-निमखेडी- कुंडाणे ते राज्य महामार्ग ६० रस्ता प्रजिमा ६० चे मजबुतीकरण, डांबरीकरण व जलनिस्सारणासह सुधारणा- ८ कोटी, राज्य महामार्ग ६० लोणकुटे-कापडणे-न्याहळोद-जापी-निमखेडी-कुंडाणे ते राज्य महामार्ग ६० चे मजबुतीकरण, डांबरीकरण व जलनिस्सारणासह सुधारणा- ८ कोटी. नंदाळे-बोरकुंड-मांडळ ते आर्वी रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरणसह सुधारणा- ८ कोटी, धुळे शहरातील नेहरू चौक ते वाडीभोकर रस्ता ते गोंदूर विमानतळ रस्त्यात दुभाजकासह सिमेंट-काँक्रिट रस्ता, सिमेंट-काँक्रिट गटार, फुटपाथ बांधकाम, स्टेडिअम ते वलवाडी दरम्यान दुभाजकासह चौपदीकरण करणे ८ कोटी. बोरकुंड ते तरवाडे रस्त्याची सुधारणा करणे २.५ कोटी जुनवणे ते हेंद्रुण रस्त्याची सुधारणा करणे २ कोटी, सिताणे ते पिंजारपाडे रस्त्याची सुधारणा करणे- एक कोटी, धाडरे-ह्यादळ रस्त्याची सुधारणा करणे- दीड कोटी, नाणे ते होरपाडे रस्त्याची सुधारणा करणे- दीड कोटी, बोरकुंड-रतनपुरा ते रवाजे शिवार रस्त्याची सुधारणा- तीन कोटी, राज्य महामार्ग २११ ते नाणे रस्त्याची सुधारणा- २ कोटी. निधी मंजूर झाला आहे.


# उ.बा.ठा.गटाने नोंदवलेली आकडेवारी खोटी : ॲड. भावसार

### शुभांगी पाटलांनी ३० हजार शिक्षकांच्या नोंदणीची सत्यता समोर आणावी

**धुळे । प्रतिनिधी**

विधान परिषद नाशिक शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकांसाठी उ.बा.ठा गटाने नोंदवलेली आकडेवारी खोटी व संभ्रम निर्माण करणारी आहे. शुभांगी पाटलांनी ३० हजार शिक्षकांच्या नोंदणीची सत्यता समोर आणावी, असे आव्हान महाराष्ट्र राज्य शिक्षक व न्याय हक्क परिषदेचे ॲड. महेंद्र भावसार यांनी शुभांगी पाटलांना दिले आहे.

याबाबत प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात ॲड.भावसार यांनी म्हटले आहे की, विधान परिषद नाशिक शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकांसाठी महाविकास आघाडीने ३० हजार शिक्षकांची मतदान प्रक्रियेत नावे नोंदवली आहेत असा माध्यमांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रकार केला आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या शुभांगी पाटील यांनी पत्रकातून ही आकडेवारी जाहीर केली आहे. त्या स्वतः ला शिक्षक विधान परिषद निवडणुकांमध्ये आपली दावेदारी आहे हे दर्शवण्यासाठी असल्या



बातम्या प्रसारित करत असल्याचा आरोपही ॲड. भावसार यांनी केला आहे. तसेच महाराष्ट्र राज्य शिक्षक व न्याय हक्क परिषदेकडून आजवर ३६ हजार ७२० शिक्षक मतदारांच्या नोंदणी करण्यात आली आहे. नाशिक विभागातील पाचही जिल्ह्यात नाशिक- १७,१९२, धुळे- ७,००९, जळगाव- ९,६८०, नंदुरबार- ३,३७८ आणि नगर- ९,४१७ असे ४६,६२६ मतदारांची नोंदणी झाली आहे. येणार्या काळात नोंदणीची संख्या वाढणार असल्याची माहितीही ॲड.भावसार यांनी दिलीय. दरम्यान, नाशिक शिक्षक पदवीधर मतदार संघातून अनेक उमेदवार चर्चेत आहेत. विद्यमान आमदार किशोर दराडे शिक्षकांना न्याय देण्यात अपयशी ठरले आहेत, असा सूर मतदारांमधून ऐकायला मिळतोय. गेल्या साडेपाच वर्षात प्रभावी भूमिका मांडू न शकल्याने त्यांना पुन्हा एकदा उमेदवारी मिळण्याची शक्यता कमीच आहे. सध्या उत्तर महाराष्ट्रात महाराष्ट्र राज्य शिक्षक व न्याय हक्क परिषदेचे ॲड. महेंद्र भावसार यांनी उमेदवारी करण्याचा निर्णय घेतल्याने निवडणुकीत अधिक रंगत येणार आहे.

# बालाजी प्लायवूडचे गोडाऊन फोडले; व्यापाऱ्यांमध्ये घबराट

**धुळे । प्रतिनिधी**

मोहाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत पहाटे चोरट्यांनी धुमाकुळ घातला. अवधान परिसरात असलेली दोन प्लायवुडच्या दुकानांसह याच परिसरातील एक दुकान फोडले. यात बालाजी प्लायवूड दुकानातील ड्राव्हरमध्ये ठेवलेली सहा लाखांची रोकड चोरट्यांनी लंपास केली. तर अन्य दोन घटनांमध्ये चोरट्यांच्या हाती निराशा आली. बालाजी प्लायवुडमधील चोरीची घटना सीसीटिव्हीत कैद झाली आहे. याप्रकरणी दुपारी उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते. मोहाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अवधान शिवारात असलेल्या बालाजी प्लायवूडला रात्री पाऊण वाजेच्या सुमारास लक्ष केले. येथील वॉचमन गाढ झोपेत असल्याची संधी चोरट्यांनी साधली. चोरट्यांनी दुकानाच्या एकाच बाजुला लावलेले कुलूप तोडले तसेच शटर उचकटून आत प्रवेश केला व दुकानाच्या ड्राव्हरमध्ये ठेवलेली सहा लाखांची रोकड लंपास केली. यासंदर्भात दुपारी उशिरापर्यंत मोहाडी नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.



**शामपुष्प एजन्सीलाही केले लक्ष्य**

अवधान शिवारातील टोलनाक्याजवळ असलेल्या टॉपलाईन वेअर हाऊसलाही चोरट्यांनी लक्ष्य केले. या ठिकाणी नंदुरबार येथील सचिन शर्मा यांनी शामपुष्प नावाची एजन्सी सुरू केली आहे. या एजन्सीत हल्दीरामचे प्रॉडक्ट होते. मात्र चोरट्यांच्या हाती ठोस काही लागले नाही. दरम्यान, या चोरीच्या घटनांमुळे अवधान शिवारातील व्यापार्यांमध्ये घबराट पसरली आहे. पोलिसांनी चोरट्यांचा तात्काळ बंदोबस्त करण्याची मागणी व्यापाऱ्यांमधून जोर धरत आहे.

चोरटे सीसीटिव्हीत कैद अवधान शिवारातील बालाजी प्लायवुड या दुकानात आज पहाटे पाऊण वाजेच्या सुमारास चौघे चोरटे शिरतांना सीसीटिव्हीत कैद झाले आहेत. यातील एक चोरटा शटर उचकटतांना दिसून येत आहे. तर अन्य तिघे दुकानाच्या आत व बाहेर पडतांना दिसत आहेत. सदर संपूर्ण घटना दुकानातील सीसीटिव्हीत कैद झाली आहे. चोरट्यांनी ओळख पटू नये याकरीता तोंडाला रूमाल बांधलेला दिसून येत आहे. घटनास्थळावर यांनी दिली भेट सदर घटना दुकान मालक नितीन पिंगळे यांना माहिती होताच त्यांनी मोहाडी पोलीस स्टेशनला संपर्क साधला. घटनेची माहिती मिळताच घटनास्थळावर एलसीबीचे निरिक्षक दत्तात्रय शिंदे, मोहाडी पोलीस ठाण्याचे एपीआय शशिकांत पाटील, पीएसआय विनायक मोरे, पीएसआय श्री.सूर्यवंशी, हेकॉ प्रेमराज पाटील, किसन चौधरी, पोना भूषण सपकाळे, पोकॉ सुरेश भालेराव, पोना प्रशांत चौधरी, पोकॉ राहुल गिरी, सुशील शेंडे, श्वान पथक, ठसे तज्ज्ञ घटनास्थळावर दाखल झाले. पथकाने सीसीटिव्ही कॅमेऱ्यात कैद घटनेची पहाणी केली. त्यानंतर ठसेतज्ज्ञांनी घटनास्थळावरील बोटांचे ठसे घेतले तर श्वानाने काही अंतर काढून ते पुढे अपयशी ठरले. दुकान मालक नितीन पिंगळे यांनी काल रात्रीच ४०७ वाहनात प्लायवुड भरून वाहन दुकानात लावल्याचे पथकाला सांगितले.

# काँग्रेस कार्यालयापुढेच तिरडी आंदोलन

### प्रियांक खर्गेंच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन

**मुंबई । प्रतिनिधी**

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचे पुत्र व काँग्रेसचे कर्नाटकातील मंत्री प्रियांक खर्गे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांवर केलेल्या वक्तव्याचा निषेध करीत भाजपा युवा मोर्चाच्या वतीने प्रतिकात्मक तिरडी आंदोलन करण्यात आले. विशेष म्हणजे, पहिल्यांदाच युवा मोर्चाने काँग्रेस कार्यालयावर जावून आंदोलन करण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी तातडीने कार्यकर्त्यांना रस्त्यातच अडविल्याने वाद टळला. तरीही कार्यकर्त्यांनी काँग्रेसविरोधात घोषणा देत तिरडी पेटवून दिली.

कर्नाटकातील मंत्री प्रियांक खर्गे यांनी कर्नाटक विधानसभेतून सावरकरांची प्रतिमा काढून टाकण्यात यावी अशी मागणी केली. त्याच्या निषेधार्थ शहरात भाजपातर्फे प्रतिकात्मक अंत्ययात्रा काढण्यात आली. आंदोलनात गिरीश पालवे, नाना शिलेदार, वसंत उशीर, मीनल भोसले, योगेश मैंद, अनिकेत पाटील आदी सहभागी झाले होते. भाजयुमोने काँग्रेस कार्यालयाजवळ आंदोलन केल्याने काँग्रेस पक्षाने भाजपचा निषेध नोंदविला.

## तेलंगणातील आव्हाने

मुख्यमंत्रिपदाचे रेवंत रेड्डी हेच दावेदार होते. त्याच्या रूपाने काँग्रेसला आक्रमक चेहरा मिळाला आहे. दोनवेळा मुख्यमंत्री पद भूषविलेल्या के. चंद्रशेखर राव यांना जोरदार टक्कर देऊन काँग्रेसने तेलंगण काबीज केला आहे.

पाच राज्यांच्या विधानसभेच्या निवडणुकीत तेलंगण या एकमेव राज्यात सत्ता मिळालेल्या काँग्रेसने अवघ्या चारच दिवसांत तिथल्या नव्या मुख्यमंत्र्यांची निवड केली. काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते आणि काँग्रेस प्रदेशाध्यक्ष रेवंत रेड्डी यांनी परवा मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगढमध्ये काँग्रेसला सत्ता गमवावी लागली तरी दक्षिणेतल्या एका राज्यात का होईना सत्ता संपादन करीत भाजपचा वारु रोखण्याचा प्रयत्न काँग्रेसने केला आहे. तेलंगणात काँग्रेसला मिळालेल्या यशामुळे दक्षिणेतील काँग्रेसचा प्रभाव कायम असल्याचे स्पष्ट झाले आहे. यावेळच्या निवडणुकीत भावनिक मुद्दे, बेरजेचे राजकारण, मतांचे ध्रुवीकरण या मुद्द्यांपेक्षा मतदारांवर मोफत योजनांच्या आश्वासनांची भुरळ पडली. काँग्रेसने मतदारांना दिलेल्या मोफत योजनांच्या आश्वासनांची पूर्तता करण्याचे आव्हान आता नवे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्यासमोर आहे. सहा आश्वासने काँग्रेसने दिली आहेत. त्यात महालक्ष्मी, रयतु भरोसा, गृहज्योती, युवा विकास यांसारख्या योजनांचा समावेश आहे. महालक्ष्मी योजनेद्वारे महिलांना दरमहा अडीच हजार रुपयांचे अर्थसाह्य, पाचशे रुपयात गॅस सिलिंडर आणि बसमधून मोफत प्रवास या सुविधा दिल्या जाणार आहेत. रयतु भरोसा योजनेत प्रति एकरी शेतकर्यांना १५ हजार, शेतमजुरांना दरवर्षी १२ हजार रुपये आणि भात पिकासाठी दरवर्षी पाचशे रुपये बोनस दिला जाणार आहे. गृहज्योती योजनेत दोनशे युनिटपर्यंत मोफत वीज देण्याचे आश्वासन आहे. याखेरीज तेलंगण चळवळीत काम केलेल्यांना मोफत भूखंड बेघरांसाठी जागा आणि पाच लाखाची मदत, युवकांसाठी पाच लाखाचे अर्थसाह्य अशा विविध मोफतच्या आश्वासनांची खैरात केली गेली. याआधी तेलंगणात कल्याणकारी योजना केसीआर यांनी राबविल्या. रयतु बंधु, रयतु विमा या शेतकर्यांसाठीच्या योजना आणि विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची योजना त्यांनी सुरु केली होती; पण त्यांची परिणामकारक अंमलबजावणी झाली नाही. काँग्रेसने कर्नाटकात राबविलेल्या योजना, तेलंगणात राबविण्याचे आश्वासन मतदारांना दिले. त्याची मोहिनी मतदारांवर पडली. दक्षिणेत काँग्रेसला मिळालेला हा सलग दुसरा विजय आहे.

विकास कसा करणार?

आता ही विविध आश्वासने पूर्ण करण्यासाठी निधी कोठून आणणार हा खरा प्रश्न आहे. ही विविध आश्वासने पूर्ण करण्यासाठी वर्षाला १.२ लाख कोटीचा बोजा सरकारी तिजोरीवर पडणार आहे. दोन लाख शेतकर्यांच्या कर्जमाफीची पूर्तता करण्यासाठी सुमारे तीस हजार कोटींची तरतूद सरकारला करावी लागेल. याआधी कर्नाटकाच्या निवडणुकीत काँग्रेसने अशीच आश्वासने दिली होती. त्याची पूर्तता करताना तेथील सरकारची आता दमछाक होत आहे. सुमारे पन्नास हजार कोटींचा बोजा सरकारवर पडत असून, त्यामुळे विकासकामांकडे लक्ष देणेच त्या सरकारला अशक्य होत आहे. कर्नाटकाचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी तर आमदारांना मतदार संघातील विकास कामासाठी निधीच देता येणार नसल्याची कबुली दिली आहे. केंद्रातल्या भाजप सरकारनेही कर्नाटकाला वेतन आणि इंधनासाठी जादा अनुदान देण्यासाठी नकार दिला आहे. हिमाचल आणि कर्नाटकात काँग्रेसने दिलेल्या हमीचा राजकीय प्रयोग यशस्वी झाल्यानेच तेलंगणातही पक्षाने तोच प्रयोग राबवला. निवडणुका जिंकण्यासाठी राजकीय पक्ष लोकानुनयी घोषणा करतात, काही अवास्तव स्वप्नेही दाखवतात; मात्र त्याचे विकासावर विपरीत परिणाम होतात. या दृष्टीने सर्वसामान्य मतदारांनी जागरूक राहण्याची गरज आहे. मोफत वीज हवी की, चांगल्या पायाभूत सुविधा हव्यात याचा विचार सामान्य मतदारांनीच करायला हवा. मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी केसीआर यांच्याबद्दल बोलताना त्यांचा डीएनए बिहारी असल्याचे तर आपला डीएनए तेलंगणाचा असल्याचे वक्तव्य केल्याने विरोधकांची टीका अकारण ओढून घेतली आहे.

## इन्स्टिट्यूशन ऑफ इंजीनियर्स (इंडिया)च्या सेक्रेटरी पदाचे दिवस

इन्स्टिट्यूशन ऑफ इंजीनियर्सशी मी गेले विस वर्ष संबंधित आहे, मी २००६ साली महाराष्ट्र राज्य सेंटरला निवडून आलो व लगेच जॉईंट सेक्रेटरी झालो .तो कार्यकाळ संपल्यानंतर, २००८ साली मी सेक्रेटरी झालो. श्री शांतीलाल जैन अध्यक्ष व मी सेक्रेटरी या दोन वर्षांच्या कार्यकाळात संपूर्ण महाराष्ट्रात खूप काम करता आले. सोलापूर व चंद्रपूरला लोकल सेंटर निघाली.अग्रेकल्चर व मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे दरवर्षी होणारे राष्ट्रीय संमेलन नाशिक व राहुरीला पार पडले . इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स च्या इमारतीचे व गेस्ट हाऊस दुरुस्तीचे काम झाले .तेथे कम्प्युटर सेंटर सुरू करण्यात आले. लायब्ररीचे रिनोवेशन करण्यात आले आणि कार्यक्रम म्हणाल तर दर आठवड्याला कार्यक्रम! इंस्टीट्युशन ऑफ इंजिनिअर्स चे प्रांगण मुंबईतील सर्वात मोठे हॅपनिंग सेंटर झाले .शांतीलाल जैन मुंबईतच स्ट्रक्चरल इंजिनीअर म्हणून काम करत असल्यामुळे त्यांचा मुंबईत प्रचंड संपर्क ,त्यामुळे कोणताही कार्यक्रम घ्यायचा ठरल्यास त्या क्षेत्रातील उत्तम माणसे उपलब्ध होत व व सर्व कार्यक्रम प्रायोजित असत. शांतीलाल जैन सर्व कार्यक्रमानंतर उपस्थितांना जेवण देत. ते म्हणत, मुंबईत माणूस दिवसभरच्या कामाने थकतो, आपण जेवण ठेवले तर माणसे वेळ काढून येवू शकतील, आमच्या सर्व कार्यक्रमांना ऑफिस स्टाफचे व आमच्या सर्व कमिटी मेंबर्स व पास्ट कमिटी मेंबर्स खूप सहकार्य होते



म्हणूनच एवढे प्रचंड काम होऊ शकले. ऑफिसचे काम सांभाळणारे सत्यनारायण साहेब हे पूर्वी रेल्वेत चीफ इंजिनियर होते .अमेरिकन पद्धतीने रिटायरमेंट नंतर स्लो डाउन होत त्यांनी कमी पगाराचा परंतु स्वताला बिझी ठेवणारा जॉब घेतला होता. त्यांच्या प्रशासकीय अनुभवामुळे संस्थेतील अनेक कामे मार्गी लावली. आमच्या फॉर्डच्या ऑफिसच्या काही समस्या त्यांनी मार्गी लावल्या. ऑफिसची पूर्ण प्रशासकीय उत्तम व्यवस्था लावली. त्यामुळे मी नाशिकला असलो तरी कोणतीही तक्रार माझ्याकडे येत नसे. मी नाशिक मधील माझी कामे संपवून धावपळ करत मुंबई गाठत असे. मी सकाळीच ऑफिसला दिवसभर करायच्या कामाचा चर्चा करत असे व संध्याकाळी उशिरा आढावा घेत असे .दररोजच्या फॉलो अप मुळे प्रशासकीय कामे प्रचंड वेगाने मार्गी लागली. काही प्रलंबित प्रशासकीय प्रश्न, माझ्या सर्व कमिटीने मला सहकार्य दिल्यामुळे, मी अतिशय कठोर प्रशासकीय निर्णय घेऊन मार्गी लावले.आमच्या लायब्ररीतील गोदरेजची सर्व कपाटे जुनी होती. मी सत्यनारायण साहेबांना सांगितले की सर्व कपाटांना रंग देऊन टाका. दुसऱ्या वेळी जाऊन बघतो तर त्यांनी सर्व कपाटांना अतिशय भडक व भन्नाट रंग दिला होता .मी त्यांना म्हटले असा रंग का दिला ते म्हणाले की भडक रंग आनंदी आणि उत्सवी पणाचे लक्षण आहे. तेवढ्यात एक फार सिनियर माणूस लाल पॅन्ट, पिवळा कोट घालून आला, तेव्हा सत्यनारायण मला म्हणाले, बघा किती आनंदी माणूस आहे. माझ्या नाशिककर मनाला ते फारसे भावले नाही .परंतु म्हटलं ठीक आहे. ऑफिसमधील मूर्ती ,सुभाष ,भिकाजी, सुप्रिया यांना संपूर्ण ऑफिसचा खूप अनुभव असल्यामुळे त्यांची मला खूप मदत झाली. मूर्तींचा कामाचा वेग ,टायपिंगचा वेग, कोणतेही काम समजून घेण्याची क्षमता अफलातून होती.मी नाशिकला इन्स्टिट्यूशन ऑफ इंजीनियर्स ला सेक्रेटरी होतो त्याकाळात श्री अशोक कटारिया साहेब व मी खूप काम केले होते. आमच्या कार्यकाळात नाशिक सेंटरची इमारत बांधून पूर्ण झाली व स्टुडन्ट चॅप्टर ला भारतातील सर्वोत्कृष्ट चाप्टरचा अवार्ड मिळाला. आमच्या मुंबईच्या कार्यकाळात स्टुडंट्स चाप्टरला अवार्ड मिळाला. आमच्या संदीप पॉलिटेक्निकच्या स्टुडंट्स चॅप्टर भारतातील सर्वोत्कृष्ट सेंटर्सचा अवार्ड दोन वेळा मिळाला. इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स च्या एकूण प्रशासकीय रचनेचा माझा अभ्यास होता. त्यामुळे कुठे कुठे अनुदानासाठी अर्ज करता येईल , त्याचा कुठे फोलोअप घ्यायचा ,याचा मला चांगला अनुभव होता. त्यामुळे आम्ही पाठवलेले सर्व प्रस्ताव मंजूर झाले , अनेक प्रकारचे अनुदान मिळाले .संदीप फाऊंडेशन नाशिकला झालेले मेकॅनिकल इंजिनिअरिंग चे दरवर्षी चे राष्ट्रीय संमेलन तर इंडियन इंजिनीअर्स काँग्रेस एवढे मोठे झाले. आमच्या काळात स्टुडंट्स चॅप्टर खूप क्टिव झाले, त्यामुळे -चखए करणाऱ्या विद्यार्थ्यांचा दिवसभर सेंटरवर राबता असे. इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स हाजीअलीला अतिशय सुंदर जागेत आहे .गेस्ट हाऊस रिनोवेशन मुळे पूर्ण देशभराच्या लोकांची अतिशय स्वस्तात राहायला सोय झाली.नंतर गेस्ट रूमची डिमांड वाढल्यामुळे आणखीन काही रूम गेस्ट रूम मध्ये कन्व्हर्ट करण्यात आल्या. नाशीक, नागपूर ,अमरावती, पुणे ,नगर, नवी मुंबई सेंटरला आम्ही भेटी दिल्या . संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व शाखांचे इंजीनियर्स करता मुंबईत अनेक टेक्निकल विजिट्स आयोजित केल्या . नाशिकच्या इंजीनियर्स साठी सी लिंक विजिट फार स्मरणीय राहिली. श्री शांतीलाल जैन मुंबई महानगरपालिकेच्या हाय राईज कमिटीवर असल्यामुळे त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांकरता मुंबईतील हाय राईज बिल्डिंगच्या विजीट्स आयोजित केल्या. इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअरची हाजी अली बिल्डिंग ,मुंबईत टेक्निकल विजिट तसेच अनेक कामांना जाणाऱ्या विद्यार्थ्यांकरता थांबण्याचे हक्काचे ठिकाण झाले. आमचे महाराष्ट्रातील सर्व सेंटरशी जिव्हाळ्याचे नाते तयार झाले व सर्व कार्यक्रमांना सर्वांचा उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला .शांतीलाल जैन व मी आयुष्यभराचे मित्र झालो .त्या काळात संपूर्ण महाराष्ट्रात आमचे अतिशय उत्तम नेटवर्क उभे राहिले व आजही संपूर्ण महाराष्ट्रातील मित्रांशी आमचा उत्तम संपर्क आहे.



शब्द संवाद
प्राचार्य प्रशांत पाटील
(नाशिक) मो.९५११८५९९३९

## देखणे होताहेत विवाहसोहळे!

लग्नसराई सुरू झाल्यानंतर वातावरणात एक वेगळीच प्रसन्नता अनुभवायला मिळते. सध्या हटके पद्धतीने लग्नसोहळा साजरा करण्याचा ट्रेंड लक्षवेधी ठरतोय. आमंत्रितांची संख्या कमी करून अगदी मोजक्या लोकांमध्ये देखणा विवाहसोहळा संपन्न करण्याकडे तरुणाईचा कल वाढत आहे. त्यातील अनेकजण चित्रसृष्टीमध्ये गाजलेल्या विवाह सोहळ्यांशी समांतर लग्न करताना दिसतात. या बदलत्या मानसिकतेचा वेध.

तुळशीच्या लग्नापासून देशामध्ये पुन्हा एकदा लग्नसराईचा हंगाम सुरू झाला. केवळ वधू-वरांच्याच नव्हे तर त्यांच्या मातापित्यांसह दोन्ही कुटुंबांसाठी हा सोहळा अत्यंत महत्त्वपूर्ण असतो. दोन व्यक्तींबरोबरच दोन कुटुंबांना आणि त्यातील सदस्यांना एका धाग्यात बांधत असल्यामुळे अनेकजण त्यात सक्रिय सहभागी होतात आणि प्रत्येक विधीचा आनंद लुटतात. अगदी केळवणापासून मुलीला सासरी पाठवण्यापर्यंतच्या प्रत्येक कार्यक्रमात त्यांच्या भावना गुंतलेल्या असतात. अर्थात आता लग्नसोहळ्याचे पूर्वी दिसणारे काहीसे गंभीर स्वरूप बदलले असून एक स्नेहमेळाव्याचे रूप प्राप्त होताना दिसत आहे.

थोडे मागे वळून पूर्वीचे लग्नसोहळे आठवून बघा. पेहरावापासून जेवणापर्यंतचा ठरावीक बाज, मानपान, रुसवे-फुगवे, आहेराच्या देवाण-घेवाणीची लगबग, पंगतीत बसण्यावरून बघायला मिळणारे कलगीतुरे या सगळ्यात बिचारे वधू-वर झाकोळून जायचे. किंबहुना, या सोहळ्यात त्यांना काही 'से' नसायचाच. आता मात्र लेटेस्ट ट्रेंड्स लक्षात घेऊन वधू-वरच आपल्या निकटवर्तीयांसवे या सोहळ्याचे आयोजन आणि नियोजन करताना दिसतात. आयुष्यातील हा संस्मरणीय दिवस सर्वात देखणा, आपल्या मनाजोगा आणि ट्रेंडी करण्याचा सर्वांचाच नव्हे पण समाजातील एका वर्गाचा मात्र नक्कीच विचार असतो. वेगवेगळ्या थीम्सद्वारे ते आपल्या विवाहसोहळ्यात वेगळेपण आणण्याचा प्रयत्न करतात. 'बी टाऊन'मधील अनेक तारे-तारकांच्या हटके आणि भारदस्त विवाह सोहळ्यांकडून त्यांना प्रेरणा मिळते, हे नाकारून चालणार नाही.


अलीकडेच अभिनेता रणदीप हुडाने आपल्या मैत्रिणीसवे लग्नगाठ बांधली. त्याचा हटके विवाह समाजमाध्यमांवर चांगलाच गाजला. तरुणाईमध्ये त्याविषयी चर्चा रंगली. वास्तविक, या अभिनेत्याने आपले लग्न अत्यंत साधेपणाने आयोजित केले होते. मात्र अनोख्या स्टाईलमुळे त्याने लोकांची मने जिंकून घेतली. या सोहळ्यामध्ये रणदीपबरोबरच वधू लिन लैश्रामही लक्ष वेधून घेत होती. विशेषत: दोघांच्या लग्नाच्या पोशाखांमुळे सोहळ्याला पारंपरिक देखणेपण मिळाल्याचे अनेकांनी सांगितले. त्यामुळेच आता हा नवा ट्रेंड सेट होऊ शकतो. या जोडप्याने मणिपुरी पद्धतीनुसार लग्न केले. मणिपूरमधील इंफाळ येथे पारंपरिक मेईतेई रिती-रिवाजांनुसार हा सोहळा संपन्न झाला. वधू लिनने संपूर्णत: मणिपुरी नववधूंचा पारंपरिक पोशाख असणारा 'पोलाई' परिधान केला होता. पोलाई सहसा नववधूच परिधान करतात. हा एक दंडगोलाकार स्कर्ट असून जाड कापड आणि बांबूने बनवलेला असतो. सॅटीनचे कापड आणि इतर अलंकारांनी तो सजलेला जातो. लिनच्या पोशाखाबद्दल बोलायचे झाल्यास तिने भरतकाम केलेल्या काळ्या ब्लाउज (याला सिल्क फ्युरिट म्हणतात)सह मरून रंगाचा पोलाई घातला होता. तिच्या हातात सुंदर फुले दिसत होती. लिनच्या पोलाई ड्रेसवर तळाशी सोन्याच्या जरीचे काम तसेच चांदीच्या धाग्यांनी केलेले नाजूक नक्षीकाम लक्षवेधी होते. लेयर्ड नेकपीस, बांगड्या, कडे, हातफूल, लेयर्ड टियारा, जड कानातले, मांग-टिक आणि मुकुट यांनी तिच्या लूकमध्ये मोलाची भर घातली होती. बेस मेकअप आणि मरून लिप शेडसह तिने वेडिंग लूक पूर्ण केला होता. एकीकडे वधू अशी सजलेली असताना रणदीपदेखील आपल्या खास दिवसासाठी निगुतीने तयार झाल्याचे दिसत होते. त्यानेही पारंपरिक मणिपुरी वस्त्रपरंपरेनुसार तयार केलेला पांढरा कुर्ता, कॉटनचे धोतर आणि कॉटन शॉल असा पेहराव केला होता. याशिवाय त्याने डोक्यावर पारंपरिक पगडी (कोकित) घातली होती. कपाळाला चंदनाचा टिळाही लावला. पारंपरिक लूकमधल्या त्याच्या या छबीला सोशल मीडियावर फॅन्सकडून भरभरून लाईक्स मिळाले. लिन आणि रणदीपचा रिसेप्शनचा व्हीडिओही विशेष गाजला. एकंदरच, विवाह सोहळ्यातील लूक ठरवताना आजची तरुणाई कियारा अडवाणी आणि सिद्धार्थ मल्होत्रा, आलिया भट्ट आणि रणबीर कपूर यांसारख्या आवडत्या सेलिब्रिटींच्या विवाह सोहळ्यांवर किंवा विराट आणि अनुष्काच्या आयकॉनिक युनियनवर नक्कीच डबल-टॅप करताना दिसते. ही स्थिती भारतीय लग्नाचा ट्रेंड किती विकसित झाला आहे याचे दर्शन देऊन जाते. या बदलत्या मानसिकतेमुळेच देशातील लग्नसोहळ्यामध्ये सध्या विलक्षण परिवर्तन बघायला मिळत आहे. त्यावर भारतीय संस्कृतीप्रमाणेच जागतिक संस्कृती, चित्रपट, सेलिब्रिटी विवाह आणि तांत्रिक प्रगती यांचा प्रभाव अगदी स्पष्टपणे बघायला मिळतोय. त्यामुळेच जवळपास १५ देशांमधील २५ हजारपेक्षा अधिक उद्योजक, ड्रेस डिझायनर्स, मेकअप आर्टिस्ट वा अन्य कौशल्य प्राप्त असणारे भारतीय विवाहक्षेत्राकडे आकर्षित होत आहेत. नवीन युगातील भारतीय लग्नाच्या लँडस्केपला वैविध्यपूर्ण आकार देत असून त्यातून परंपरा आणि आधुनिकतेचे मिश्रण प्रतिबिंबित होत असल्यामुळे अनेकांसाठी व्यवसायाच्या नवीन संधी निर्माण होत आहेत.

अगदी काही वर्षांपर्यंत भारतीय विवाह सोहळ्याचे स्वरूप छोटेखानी असायचे. हॉल अथवा एखाद्या मंगल कार्यालयात तो साजरा होत असे. तेव्हा उपस्थितांची संख्या जास्त होती, मात्र स्वरुप साधे दिसायचे. सध्या पाहुण्यांच्या याद्या कमी करत जोडपी या सोहळ्याचा अविस्मरणीय अनुभव घेण्यास प्राधान्य देत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळेच फार्म हाऊस आणि लॉन्ससारखी विवाहस्थळे लोकप्रिय होत आहेत. २०२२ मध्ये तब्बल ५६ टक्के भारतीयांनी विवाह सोहळ्यासाठी बँक्वेट हॉलची निवड केल्याचे एक आकडेवारी सांगते. अशा इव्हेंट्स सर्व प्रकारच्या, थोडक्यात सर्वसमावेशक सेवा प्रदान करतात. म्हणूनच तेथे पार पडणाऱ्या सोहळ्यांना भव्यतेचा अतिरिक्त स्पर्श मिळताना दिसतो. भारतीय विवाह सोहळा अधिक देखणा करणाऱ्या आणखी एका बाबीचा विचार करताना जोडप्यांच्या एकत्रित नृत्याचा आवर्जून उल्लेख करायला हवा. केवळ जोडपेच नव्हे तर त्यांचे माता-पिता आणि मित्रपरिवार तसेच जवळचे नातलगही एकत्र नृत्याचा आनंद लुटतात. त्यामुळेच आता लग्नाचे नृत्यदिग्दर्शन हेदेखील चांगले करिअर म्हणून उदयास आले आहे. अशा प्रकारच्या नृत्यामुळे समारंभांमध्ये उत्साह, ऊर्जा निर्माण होते; खेरीज उपस्थितांचे मनोरंजनही होते. आज अनेक भारतीय जोडपी लग्नादरम्यान 'फर्स्ट डान्स'चा ट्रेंड स्वीकारत असून हा खास दिवस अधिक खास करताना दिसत आहेत.

हॉलीवूड-बॉलीवूड चित्रपट आणि सेलिब्रिटी विवाहांमुळे प्रभावित झालेली काही जोडपी पारंपरिक संध्याकाळ ते सकाळच्या उत्सवकाळातून बाहेर पडत दिवसा समारंभ पार पाडत असल्याचा बदलही नोंद घेण्याजोगा ठरत आहे. वेळेतील या बदलामुळे अधिक आरामशीर वातावरण निर्माण होते. अतिथी सोहळ्याचा पूर्णपणे आनंद लुटू शकतात. यामुळे व्यावसायिक फोटोग्राफी सेवांच्या मागणीमध्येही वाढ झाली असून ८३ टक्के जोडप्यांनी नयनरम्य पार्श्वभूमीवरील आनंदक्षण कॅप्चर करण्यासाठी छायाचित्रकारांची मदत घेतल्याचे दिसून आले आहे. जागतिक पाककृतींपासून प्रेरित होऊन आता भारतीय विवाहसोहळ्यांमध्ये केटरिंग फॉरमॅटमध्येही बदल होत आहेत. युरोपियन शैलीतील टेबल सेट-अप अनेकांना आकर्षित करत आहे. विशेषत: जवळचे कुटुंबीय आणि मित्रांसह समारंभ साजरा करणाऱ्यांकडून या संकल्पनेला खूप मागणी मिळत आहे. हा ट्रेंड पाहुण्यांना जेवणाचे अनोखे अनुभव देण्याची इच्छा दर्शवतो. जेवणामध्येही आता जागतिक अन्नपदार्थांची भर पडत असून देशोदेशीचे पदार्थ उपस्थितांच्या पसंतीस उतरत आहेत.

केवळ विवाह सोहळा वा त्याच्याशी संबंधित समारंभांमध्येच नव्हे तर विवाहविषयक मानसिकतेमध्येही महत्त्वपूर्ण बदल अनुभवायला मिळत असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. जागतिक प्रवाहांच्या प्रभावामुळे १५ टक्के शहरी भारतीय जोडप्यांनी लग्नापूर्वी एकत्र राहण्याचा पर्याय निवडला असल्याचे एक सर्वेक्षण सांगते. फ्रान्स आणि स्पेनसारख्या देशांच्या तुलनेत ही प्रथा भारतात अजूनही नवजात असली तरी सामाजिक अपेक्षांमध्ये बदल आणि लग्नगाठ बांधण्यापूर्वी परस्परांमध्ये मजबूत बंध निर्माण करण्याच्या विचाराची महत्त्वाची ओळख दर्शवते. जाणवणारा दुसरा एक महत्त्वपूर्ण बदल म्हणजे आता सोशल मीडियाद्वारे लग्नाच्या घोषणा करण्याचे प्रमाण वाढले आहे. यूएस आणि यूकेच्या पावलावर पाऊल ठेवत अंदाजे ५७ टक्के भारतीय आता सर्वव्यापी मेसेजिंग प्लॅटफॉर्मचा वापर करत असून व्हॉट्स पसारख्या अ‍ॅप्सद्वारे एकमेकांशी कटिबद्धता जाहीर करत लग्नाच्या घोषणा शेअर करण्यास प्राधान्य देताना दिसतात. ही बाब डिजिटल शिफ्टिंग आणि तंत्रज्ञानावरील वाढते अवलंबित्व दाखवून देतेच, खेरीज मित्र आणि कुटुंबीयांच्या विस्तृत नेटवर्कपर्यंत पोहोचण्यासाठी मिळत असलेल्या सोयींची उपयुक्तताही ती अधोरेखित करते.

## शब्दकोडे-२५७



**आडवे शब्द**

१. मनमोहन सिंग हे पद सध्या दुसऱ्यांदा भूषवत आहेत ४. तडीपार ६. पदार्थ ९. कंटाळवाणे भाषण १०. वेदनाशामक, पित्तशामक औषधी कंद ११. आयुष्य, पाणी १३. तात्काळ, योग्य उत्तर देणारा १५. शुभ्र १७. मूर्त रूप देणे १८. ताकद १९. काम, कार्य २१. सापाची एक जात २३. निवड न करता २४. जास्तीतजास्त व कमीतकमी २६. ताप जाण्यासाठी असा घाम येणे आवश्यक २७. प्रतिष्ठा २८. आहे त्यात निभावण्याची आज्ञा! ३०. करुणा, कीव ३२. मधुमक्षिका ३५. नऊ भावनांचा समुच्चय ३६. रावण ३७. उडालेला थेंब ३८. माल साठविण्याची जागा ३९. जे सूर्यालाही दिसत नाही ते म्हणे या मंडळींना दिसते! ४०. मांडी, आकडा ४१. गोल गरगरीत ४३. कोवळा अंकुर ४५. हंगाम, पाळी ४६. गणपतीचे एक नाव ४८. सोंगाड्या ४९. गेरू ५०. स्वच्छ, निर्भेळ ५१. रसाळ ५४. सरपटणारा आणि चिवट पकड असणारा प्राणी ५६. निर्लज्ज, निगरगट्ट ५७. तथाकथित काळी जादू ५८. मेथीची चव ६०. उत्तर दिशा, सवय, राबता ६१. कृती न करता बघणारे, प्रेक्षक ६२. चोरी करणारा ६३. सोपे (हिंदी) ६५. दारावरील खुणेचा आवाज ६७. धातूची तार काढणारा ६८. शर्करा ६९. मऊ, नरम च्या विरुद्ध

**उभे शब्द**

१. जुन्या काळचे शिक्षकांचे संबोधन २. मुख्य कचेरी (हिंदी) ३. मऊ होणे ४. दु:खी होणे ५. खुंट, मेख ६. गोल गोल गोड पदार्थ ७. सगळ्या धर्मातील लोकांना सारखी वागणूक देण्याचे तत्त्व ८. ज्ञान, उकल १०. दुर्लक्ष झाल्यामुळे होणारे हाल १२. व्रत १४. प्रचंड १९. हात २०. मध २१. अंत:करण २२. दात २३. चोघड्याबरोबरचे मांगल वाद्य २५. लेखक, वक्तेफ यांना मिळणारी सन्मानाची रक्कम २६अ. सुखावणारा वास २७. सुरुवातीलाच अडथळा येणे या अर्थी वाक्प्रचार २९. उष्ण ३१. स्वकीयांची लढाई ३२. आर्जव, खुशामत ३३. लाकडी चपला ३४. निमगोरा ३५. खून करणे, मारून रक्त पिणे ४०. नामनिराळे होणे ४२. अणकुचीदार ४४. फुरसत ४७. बाण ४९. कपडालत्ता ५०. दिवेलागणीचा ोक- '----- कल्याणम् आरोग्यम् धनसंपदा' ५२. आरास, देखावा ५३. वाळवंट ५५. फुरसत ५९. खिल्ली, चेष्टा ६०. कसदार ६४. वेल ६५. एकाग्र दृष्टी ६६. कशा प्रकारचा बटवा?

### शब्दकोडे-२५६ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.आर.आर. पाटील
६.फौजदार ९.तंगडी ११.क्षत
१२.हारजीत १४.सनगर १६.घण
१७.विलोभनीय १९.नस
२१.मज २४.टर २५.तन २७.रम
राट २९.दामोदर ३१.धाक
३२.बदन ३३.रवरव ३५.सराईत
३७.जयद्रथ ३९.लाभ ४०.खर्व
४१.शरम ४३.रसवान ४५.नागर
४६.राबता ४८.वहाण
४९.लवकुश ५१.चर ५३.सजन
५४.गदा ५५.भारवाहक
५७.कस ५९.जबाबदारी
६१.पसरणी ६२.जलतरण
६४.पात ६५.घर ६६.मतदार
६८.आयकर ६९.पळपुटा
७०.घरंदाज ७२.माहितगार
७५.पदर ७७.रास ७९.शीरा
८०.वतनदार ८१.गेला बाजार

**उभे उत्तर**

१.रक्षण ३.आत ४.पाणलोट
५.लहानी ६.फौजी ७.जतन
८.रस ९.तंग १०.गरम १३.रयत
१५.नजरानजर १६.धनदाट
१८.भरधाव २०.सरबत
२२.जनपथ २३.उदरभरण
२६.नवरा २८.मद ३०.रव
३४.रखवालदारी ३५.सर्वनाश
३६.ईश्वरचरणी ३८.यमराज
४१.शक्य ४२.नवरोज ४४.नव
४७.बनकर ५०.कुरापत
५२.रवा ५३.सकल ५४.गदाधर
५५.भारतीय ५६.हजर
५८.सणवार ६०.बाबत
६३.तजवीज ६४.पातळ
६५.घरघर ६६.मधमाशी
६७.दानत ६८.आटा ६९.परत
७१.दादला ७३.हिरा ७४.गाव
७६.दगा ७७.राजा ७८.सर

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# सरसकट कुणबी प्रमाणपत्र दिलं तर राज्यात मराठाच शिल्लक राहणार नाही- मंत्री भुजबळ

## मराठा समाजाला आमचा विरोध नाही, आमचा विरोध झुंडशाहीला आणि दादागिरीला आहे





**इंदापूर । प्रतिनिधी**

मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी आमचा विरोध नाही, त्यांना स्वतंत्र आरक्षण द्या, ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लावू नका, आम्ही एवढंच मागतोय. परंतु कुणी दादागिरीची भाषा करत असेल तर आम्ही देखील दादागिरीने उत्तर देऊ असे सांगत मंडलच्या वेळी देखील सर्व एकत्र येऊन लढले होते. आताही ओबीसींच आरक्षण वाचविण्यासाठी सर्व पक्षातील नेत्यांनी पुढं यायला हवं असे आवाहन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले.

काल इंदापूर येथे राज्यभरातील ओबीसी नेत्यांच्या उपस्थितीत भटके विमुक्त ओबीसी आरक्षण बचाव एल्गार मेळावा पार पडला. यावेळी ते बोलत होते. या मेळाव्यास बहुसंख्येने ओबीसी बांधव उपस्थित होते. यावेळी प्रकाश शेंडगे, माजी मंत्री आ.महादेव जानकर, आ. गोपीचंद पडळकर, भटक्या विमुक्तांचे नेते प्रा.लक्ष्मण गायकवाड, मुस्लिम ओबीसी संघाचे शब्बीर अन्सारी, प्रा.टी.पी.मुंडे, आगरी नेते प्रा. राजाराम पाटील, माजी खासदार समीर भुजबळ, रामोशी समाजाचे नेते दौलत शितोळे, इतर मागासवर्ग आयोगाचे माजी सदस्य प्रा.लक्ष्मण हाके, नाभिक समाजाचे नेते कल्याण दळे, आयोजक ॲड.कृष्णाजी यादव, पांडुरंग शिंदे यांच्यासह सकल ओबीसी, भटके विमुक्त जाती, एसबीसी आणि अल्पसंख्याक समाज व इंदापूर येथील पदाधिकारी व ओबीसी बांधव लाखोंच्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, महाराष्ट्रात अशांतता निर्माण करण्याचं काम करतोय असे लोक म्हणतात. त्यांना सांगायचं आहे की, त्यांच्या पंधरा सभा झाल्यानंतर आम्ही 'सौ सोनार की एक लोहार की' म्हणून एक सभा घेऊन आमची भुमिका मांडत आहोत. अशावेळी मात्र त्यांना कायद्यात सुट दिली जातेय. त्यांना कायदा वेगळा लावला जातोय त्यावर कुणीही बोलायला तयार नाही. त्यांना कायद्याची सुट आणि आम्हाला मात्र कायदा लावला जातोय अस दिसतंय. त्यामुळे राज्यात अशांतता कोण निर्माण करतंय याचा सर्वांनी अभ्यास करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

ते म्हणाले की, अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच मोठ नुकसान झालं. तेथील शेतकऱ्यांनी मला फोन केला की तुम्ही बघायला या. त्यावेळी मी पाहणीस गेलो. तीन लाखांच्या मतदारसंघात तीस लोक गो बॅकचे बोर्ड घेऊन पुढे आले. अगदी सगळ्या ठिकाणी तेच होते. त्यानंतर मी ज्या रस्त्यांनी गेलो ते रस्ते आम्ही शुद्र आहोत म्हणून गोमुत्र टाकून साफ केलं. मग आम्ही जर शुद्र असू तर प्रमाणपत्र घेऊन शुद्र का होताय? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

तसेच बिहार सारखे राज्य जातनिहाय जनगणना करू शकते मग महाराष्ट्र का करू शकत नाही. महाराष्ट्रात देखील जात निहाय जनगणना करायला हवी. शिंदे आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती शिंदे जी भूमिका घेत आहे त्याला आपला विरोध असून गेल्या दोन महिन्यात देण्यात आलेले कुणबी दाखले रद्द करावे. ओबीसींचा नोकऱ्यांमधील अनुशेष भरून काढावा. मराठा समाजाला वेगळ आरक्षण द्याव. ओबीसी आरक्षणाला धक्का लाऊ नये अशा मागण्या त्यांनी यावेळी केल्या.

# नाशिकचा लिव्हेबल इंडेक्स वाढण्यासाठी नाशिक पोलीस प्रशासनासोबत क्रेडाईचा सक्रिय सहभाग



**नाशिक । प्रतिनिधी**

शांत आणि सुरक्षित शहर हे सर्वांना हवेहवेसे वाटत असून अशा शहरात आपले घर असावे हे अनेकांना वाटते. यामुळे नाशिकमध्ये अनेकजण रियल इस्टेटमध्ये गुंतवणूक करत आहेत. शहरातील वातावरण सौहादपूर्ण आणि सुरक्षित होऊन नाशिक ही लिव्हेबल सिटी व्हावी यासाठी पोलीस प्रशासन नेटाने कार्य करत असून त्यांच्या या कार्यामध्ये नेहमीप्रमाणे क्रेडाईचा सक्रिय सहभाग असेल. अशी ग्वाही क्रेडाई नाशिक मेट्रोचे अध्यक्ष कृणाल पाटील यांनी दिली.

नाशिकचे नूतन पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांचे क्रेडाई नाशिक मेट्रोतर्फे स्वागत करण्यात आले त्याप्रसंगी ते बोलत होते. कृणाल पाटील पुढे म्हणाले की, बांधकाम उद्योगात रेरा कायद्यामुळे सुसूत्रता आली असून हा कायदा ग्राहक हिताचा आहे. याशिवाय क्रेडाई नाशिक मेट्रोतर्फे ग्राहक ग्राहक तक्रार निवारण केंद्र देखील कार्यरत असून बांधकाम बाबत काही तक्रारी असल्यास आधी वरील सुविधांचा उपयोग करावा असेही ते म्हणाले.

सुरक्षित शहरात अधिकाधिक गुंतवणूकदार तसेच पर्यटक शहरात येतात याचा एकूणच शहराच्या अर्थकारणात लाभ होतो पोलिस प्रशासनातर्फे यासाठी नेहमीच सक्रिय व सकारात्मक भूमिका बजावली आल्याचे देखील ते म्हणाले.

याप्रसंगी राष्ट्रीय क्रेडाई व क्वालिटी काऊन्सिल ऑफ इंडियाचेचे जीतुभाई ठक्कर, क्रेडाई नाशिक मेट्रोचे मानद सचिव गौरव ठक्कर, उपाध्यक्ष जयंत भातंब्रेकर, सहसचिव नरेंद्र कुलकर्णी, मॅनेजिंग कमिटी सदस्य मनोज खिवंसरा, विजय चव्हाणके, हंसराज देशमुख, अनंत ठाकरे, सागर शाह, तुषार संकलेचा उपस्थित होते.

# एम फाईन आणि त्रिमूर्ती डायग्नोस्टिक्सचा सहकार्य करार

**नाशिक ।** जेनेटिक्स आणि मॉलिक्युलर डायग्नोस्टिक्समध्ये अग्रस्थानी असलेल्या एम फाईन लॅबने नाशिकमधील नामांकित त्रिमूर्ती डायग्नोस्टिक्स सोबत सहकार्य करार केला असून, नाशिकमधील त्यांच्या सेवेला कालपासून आरंभ झाला आहे. नाशिकमध्ये आरोग्य क्षेत्रात मोठ्या संधी असून, एम फाईन लॅबचे नाशिकमधील आगमन आरोग्य सेवेतील एक महत्वपूर्ण पाऊल असल्याचे लाइफसेल इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्याधिकारी मयूर अभया यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. भारतभरातील १५० मुख्य शहरांसह ४० अत्याधुनिक लॅब्सचे जाळे असलेल्या आणि २०० पेक्षा जास्त कलेक्शन सेंटर्स असलेल्या या लॅबमुळे नाशिक मधील रुग्णांना आता ४५०० हुन अधिक तपासण्या एकाच छताखाली करता येणार आहेत. यासाठी लॅबने रुग्णांच्या घरासह कार्यालयात येऊन सुद्धा रक्त नमुने घेऊन जाण्याची व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे. अनेक महत्वाच्या चाचण्यांसाठी नाशिकमधील रुग्णांना आजही मुंबई किंवा पुणे येथील लॅब्सवर अवलंबून राहावे लागत होते. एम फाईन आणि त्रिमूर्ती डायग्नोस्टिक्सच्या सहकार्याने आता ही अडचण दूर झाली असून, मानवी शरीरातील कोणतीही चाचणी या लॅबमुळे आता नाशिकमध्ये शक्य होणार आहे.

# ज्ञानेश्वरी दाखवते योग्य मार्ग: डॉ.गुट्टे महाराज



### अमृतधामला संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळ्यास प्रारंभ

**नाशिक । प्रतिनिधी**

ज्ञानेश्वरीतील प्रत्येक ओवी अनुभवताना एक विलक्षण असा अनुभव येतो.अनेकदा असे वाटते साक्षात ज्ञानेश्वर महाराज आपल्याशी संवाद साधत आहे. ज्ञानेश्वरी वाचनाने आपली वैयक्तिक दुःख विसरत जातो. ज्ञानेश्वरीतील एकेक शब्द शब्द म्हणजे अमृता समान आहे. कर्तव्य विसरून भरकट चाललेल्या माणसाला ज्ञानेश्वरी योग्य मार्ग दाखवत असल्याचे विचार संत साहित्याचे अभ्यासक, श्री सिध्दी विनायक मिशन चे संस्थापक अध्यक्ष डॉ तुळशीराम महाराज गुट्टे यांनी व्यक्त केले.

पंचवटीतील अमृतधाम येथील श्री वरद गणेश मंदिर येथे श्री सिध्दी विनायक मिशनतर्फे चार दिवसीय ७२७ व्या संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळ्यास शुक्रवारी ( दि. ८) प्रारंभ झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी शिवसेना (शिंदे गट) दिंडोरी लोकसभा संपर्कप्रमुख राजेंद्र सोनवणे, चित्रपट निर्माता शरद उगले, दिव्यांग आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब घुगे, ज्येष्ठ उद्योजक बुधाजी पानसरे, वसंत सोशल फाउंडेशन अध्यक्ष नंदू सानप, श्याम पिंपरकर, गणपत हाडपे आदी उपस्थित होते.

गुट्टे महाराज म्हणाले की, वाईट लोकांचा अंधकार नाहीसा होऊन, स्वधर्म सूर्याच्या प्रकाशाने विश्व ढवळून निघते, ते केवळ ज्ञानेश्वरीचाच कृपाप्रसाद आहे. ज्ञानेश्वरी एक दिशादर्शक असे काव्य असून, ज्ञानेश्वरीतून ज्ञानदेवांच्या मनवृत्तीचे दर्शन घडते. जीवनाला परममंगल्ये देणाऱ्या जीवनमूल्यांचा जयघोष ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीत केला आहे. पवित्र सौंदर्य सूर्यप्रकाशातली संजीवकता, चंद्र किरणातील शितलता ज्ञानेश्वरीत अनुभवायला मिळते असेही डॉ गुट्टे यांनी सांगितले. यावेळी त्यांनी विविध दाखले देत ज्ञानेश्वरीतील प्रसंग विशद केले. वरद विनायक गणेश मदिर ट्रस्टचे अध्यक्ष उमेश तोतरे, सचिव चंद्रकांत भामरे, चंद्रकांत पाटोळे , गणपत हाडपे, बाळासाहेब सोनवणे, ,संजीव अहिरे, संदेश सांगळे, अनिल सांगळे, चोपदार नामदेव भोर यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री सिध्दी विनायक मानव कल्याण मिशनतर्फे करण्यात आले आहेत.

---

प्रोसेस जमा — ॲड. श्री.मनोजकुमार डी. खैरनार, साक्री

## जाहीर नोटीस

**साक्री येथील मे. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज क्र. ४०४/२०२३**

श्री. धनराज निंबा पाटील व इतर, उ.व.४४, धंदा-शेती,
राहणार-इंदवे, ता.साक्री, जि.धुळे, ... **अर्जदार**

**॥ विरुध्द ॥**

**कोणीही नाही .... सामनेवाला**

मयत - कै.हिराबाई निंबा देसले (मृत्यू दि.-२२/०८/२०२०)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे.सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, येथे दिनांक ०१/१२/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. हिराबाई निंबा देसले याचे दिनांक २२/०८/२०२० रोजी निधन झाले आहे, मयताच्या मृत्यूसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१. श्री. धनराज निंबा पाटील, २. सौ. रेखाबाई विलास पाटील, ३. कु. रोहित पोपट पाटील-अपाक, ४. कु. दिव्या पोपट पाटील-अपाक, ५. कु. तनुजा पोपट पाटील-अपाक,

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय, निमशासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, साक्री कोर्ट क. २ यांचे न्यायालयात दिनांक २०/०१/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित अरण्यात येईल. सदर जाहिर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ-साक्री
दिनांक-०७/१२/२०२३ (शिक्का) आदेशावरुन,

**क. लिपीक, कामगिरी कारकुन, साक्री** — **सहायक अधिक्षक, सह दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री**

---

ॲड. दिनेश मधुकर कोळी'
साक्री कोर्ट

## जाहीर नोटीस

**साक्री येथिल मे. दिवाणी न्यायाधीश सो क.स्तर यांचे कोर्टात**

**दि. कि. अ. नं. ३१०/२०२२**

श्री. भाऊसाहेब पांडुरंग पवार वगैरे ... **अर्जदार**

**॥ विरुध्द ॥**

**कोणीही नाही .... सामनेवाला**

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (VIII) बॉम्बे १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशीप सर्टीफिकेट) मिळण्यासाठी मे. दिवाणी न्यायालयात क स्तर कोर्टात दाखल केला आहे कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की कैपांडुरंग उर्फ पांडु काळु पवार पाटील यांचे दि.३१.०८.२०१७ रोजी मौजे. दिघावे ता. साक्री जि. धुळे येथे निधन झाले आहे. मयताला मुत्युसमयी खालीलप्रमाणे वारस होते

१) श्री.भाऊसाहेब पांडुरंग पवार- मुलगा २) श्री.महेंद्र पांडुरंग पवार - मुलगा

मयताला वरीलप्रमाणे वारस असुन यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही मौजे दिघावे, ता.साक्री, जि.धुळे येथिल सि.स.नं. ७९ व ८० या मिळकतीवरती वारस लावण्याकामी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसव्यतिरीक्त वारस हक्का असल्यास सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी या जाहिर नोटीसीदवारे कळविण्यात येते की वरील वारसा व्यतीरीक्त कोणाचा काहीही हक्क व अधीकार असल्यास त्यांनी साक्री येथील मा. दिवाणी न्यायाधीश क.स्तर यांच्या न्यायालयात दि.०६/१२/२०२३ रोजी स्वत अगर वकीलामार्फत हजर राहावे वरीलप्रमाणे करण्यास चुकल्यात तर आपल्या या अर्जाच्याकामी कोणत्याही प्रकारचे काहीएक हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाच्या सही शिक्यानिशी प्रसीध्दीत दिली आहे.

स्थळ- साक्री
दि.०३/११/२०२३ (शिक्का)

**कामगिरी कारकुन, दिवाणी न्यायलय क.स्तर साक्री** — **सहा.अधिक्षक, दिवाणी न्यायलय क.स्तर साक्री**

---

प्रोसेस जमा — ॲड. श्री. अक्षय ए. सगर, साक्री

## जाहीर नोटीस

**साक्री येथील मे. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज क्र. ४०१/२०२३**

श्री. आनंदा सुकलाल मासुळे व इतर, उ. व. ५२, धंदा-शेती,
राहणार - सतमाने, ता. साक्री, जि. धुळे, ... **अर्जदार**

**॥ विरुध्द ॥**

**कोणीही नाही .... सामनेवाला**

मयत - कै.सुकलाल तुळशिराम मासुळे - ( मृत्यू दि.-३०/०६/२०२३)
मयत - कै.ठगुबाई सुकलाल मासुळे - ( मृत्यू दि.-११/०१/२००४)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, येथे दिनांक ०१/१२/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. सुकलाल तुळशिराम मासुळे याचे दिनांक ३०/०६/२०२३ व कै.ठगुबाई सुकलाल मासुळे याचे दिनांक ११/०१/२००४ रोजी निधन झाले आहे, मयताच्या मृत्यूसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१- श्री. आनंदा सुकलाल मासुळे, २- श्री. बापु सुकलाल मासुळे, ३- श्री. रविंद्र सुकलाल मासुळे, ४- श्री. रतिलाल सुकलाल मासुळे, ५- श्रीमती. निलाबाई रामभाउ पाटील, ६- कलाबाई काशिनाथ पाटील, ७- लताबाई नारायण पदमोर (पाटील), ८- सुनंदाबाई भुरा पदमोर (पाटील)

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय, निमशासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, साक्री कोर्ट क्र. २ यांचे न्यायालयात दिनांक २०/०१/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित अरण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ-साक्री
दिनांक-०७/१२/२०२३ (शिक्का) आदेशावरुन,

**क. लिपीक, कामगिरी कारकुन, साक्री** — **सहायक अधिक्षक, सह दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री**

---

**मे.तहसिदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी साक्री यांचे न्यायालय**

## जाहीर नोटीस

**तहसिल कार्यालय, साक्री**
**जन्म/मृत्यू नोंद र. क्र.०३/२०२३**
**दिनांक २८/११/२०२३**

श्री. मेहरु उत्तम बागले (भिल)
रा.उंभराडी ता.साक्री जि.धुळे ... **अर्जदार**

**॥ विरुध्द ॥**

**निबंधक जन्म मृत्यु,**
**तथा**

ग्रामसेवक, ग्रामपंचायत उभंराडी,
ता. साक्री जि.धुळे .... **जाबदेणार**

(आखाड्या माह्या भिल यांचा मृत्यू दि.१०/०६/२००५)

ज्याअर्थी अर्जदाराने दि.०१/११/२०२३ रोजी अर्ज नं.०३/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदाराने जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे आखाड्या माह्या भिल यांच्या मृत्यू नोंद करणेबाबत साक्री येथील मे. तहसिलदार सो. यांचे कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. तहसिलदार साक्री पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौकशी दि.२६/१२/२०२३ रोजी सकाळी ११.०० सुनावणी ठेवण्यात आली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीताना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास साक्री येथील मे.. तहसिलदार सो. यांचे कार्यालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे.तहसिलदार यांनी दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर जाहिर नोटीस साक्री येथिल मा.कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार साक्री यांचे सही व शिक्यानिशी दि. २८/११/२०२३ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

(शिक्का)

**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार साक्री**

---

**मे.तहसिदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी साक्री यांचे न्यायालय**

## जाहीर नोटीस

**तहसिल कार्यालय, साक्री**
**जन्म/मृत्यू नोंद र. क्र.०६/२०२३**
**दिनांक २८/११/२०२३**

श्री भरत विठ्ठल पवार वगैरे
रा.उंभराडी ता.साक्री जि.धुळे ... **अर्जदार**

**॥ विरुध्द ॥**

**निबंधक जन्म मृत्यु,**
**तथा**

ग्रामसेवक, ग्रामपंचायत वर्धाने,
ता. साक्री जि.धुळे .... **जाबदेणार**

( खुशी भरत पवार यांचा जन्म दि.०१/१२/२०१६)

ज्याअर्थी अर्जदाराने दि. ०९/११/२०२३ रोजी अर्ज नं.०६/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदाराने जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे खुशी भरत पवार यांची जन्म नोंद करणेबाबत साक्री येथील मे. तहसिलदार सो. यांचे कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. तहसिलदार साक्री पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौकशी दि. २६ / १२ / २०२३ रोजी सकाळी ११.०० सुनावणी ठेवण्यात आली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीताना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास साक्री येथील मे. तहसिलदार सो. यांचे कार्यालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे. तहसिलदार यांनी दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर जाहिर नोटीस साक्री येथिल मा.कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार साक्री यांचे सही व शिक्यानिशी दि. २८/११/२०२३ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

(शिक्का)

**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार साक्री**

---

**मे.तहसिदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी साक्री यांचे न्यायालय**

## जाहीर नोटीस

**तहसिल कार्यालय, साक्री**
**जन्म/मृत्यू नोंद र. क्र.०९/२०२३**
**दिनांक २८/११/२०२३**

श्री भरत विठ्ठल पवार वगैरे
रा.उंभराडी ता.साक्री जि.धुळे ... **अर्जदार**

**॥ विरुध्द ॥**

**निबंधक जन्म मृत्यु,**
**तथा**

१. ग्रामसेवक, ग्रामपंचायत जैताणे,
ता.साक्री जि.धुळे .... **जाबदेणार**

(विकास भरत पवार यांचा जन्म दि.०१/०६/२०२३)

ज्याअर्थी अर्जदाराने दि.०९/११/२०२३ रोजी अर्ज नं. १०/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदाराने जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३(३) प्रमाणे विकास भरत पवार यांची जन्म नोंद करणेबाबत साक्री येथील मे. तहसिलदार सो. यांचे कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. तहसिलदार साक्री पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौकशी दि. २६/१२/२०२३ रोजी सकाळी ११.०० सुनावणी ठेवण्यात आली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीताना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास साक्री येथील मे. तहसिलदार सो. यांचे कार्यालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे. तहसिलदार यांनी दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर जाहिर नोटीस साक्री येथिल मा.कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार साक्री यांचे सही व शिक्यानिशी दि.२८/११/२०२३ रोजी प्रसिद्धी दिली असे.

(शिक्का)

**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार साक्री**

## न्यूज कॉलम

### गावठी बंदुक बाळगणारा गजाआड

**नाशिक ।** नाशिक ग्रामीण जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस अधीक्षक श्री शहाजी उमाप यांनी कारवाई करण्यासाठी आदेशित केले होते. तसेच जिल्ह्यातील अवैध शस्त्र बाळगणारे इसमांचा शोध घेऊन कारवाई करणे बाबत सूचना दिल्या होत्या. शहरालगत असलेल्या बोरटेंबे गावात एक इसम संशयितरित्या अवैध शस्त्र घेऊन फिरत असल्याची बातमी मिळाली होती.

### पीकअपच्या धडकेत एक जागीच ठार

**नाशिक ।** पेठ-नाशिक-पेठ राष्ट्रीय महामार्गवर दिडोंरी तालुक्यातील गोळशी फाट्याजवळ भरधाव पीकअप वाहनाने रस्त्याने जाणाऱ्या एकास जोरदार धडक दिली. चाचडगाव (ता. दिंडोरी) येथील फकीरा छगन गांगुर्डे रस्त्याने जात होते. गोळशीकडून नाशिककडे टोमॅटो घेऊन जाणाऱ्या पीकअप (एमएच १५, एजी ९८३९)ने गांगुर्डे यांना जोरदार धडक दिली. या अपघातात फकीरा गांगुर्डे जागीच ठार झाले.

# वालखेडा ग्रामपंचायत लोकनियुक्त सरपंचपदी शैलजा पाटील विराजमान

### उपसरपंच पदी सुरेश कोळी यांची बिनविरोध निवड

**चिमठाणे । प्रतिनिधी**



तालुक्यातील वालखेडा ग्रामपंचायत कार्यालयात लोकनियुक्त सरपंच यांनी प्रशासक ग्रा. पं. विस्तार अधिकारी पंचायत समितीचे ए.ओ.जाधव कडून कार्यभार स्विकारण्यानंतर उपसरपंच पदासाठी निवड प्रक्रिया सभा संपन्न झाली. त्यात उपसरपंच पदी सुरेश देविदास कोळी यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

सकाळी दहा वाजेपासून उपसरपंच पदासाठी प्रक्रिया राबविण्यात आली. शेतकरी विकास पॅनलचे सदस्य सुरेश देविदास कोळी यांनी एकमेव अर्ज दाखल केला. सदर पॅनलचे अकरा पैकी अकरा सदस्य निवडुन आल्यावर त्यांचे स्पष्ट बहुमतासह वर्चस्व राहिले. दुपारी दोन वाजता लोकनियुक्त सरपंच शैलजा किशोर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेण्यात आली. ग्रामसेवक चेतन पाटील यांनी सभेचे इतिवृत्त वाचून दाखवले. उपसरपंच पदासाठी एकमेव अर्ज आल्याने सुरेश देविदास कोळी यांची बिनविरोध निवड झाल्याचे घोषित केले.

सभेला दगडु लोटन अहिरे, सचिन रविंद्र वानखेडे, भगवान गुलाब येळवे, प्रकाश बापू भदाणे, नुराबाई केसरसिंग मालचे, प्रिती अशोक मालचे, प्रमिला निंबा वानखेडे, वंदना अनिल येवढे, यशोदा धनराज साळवे, राधिका विनोद मोरे सदस्य उपस्थित होते. उपसरपंच निवडीनंतर एकच जल्लोष करित गावातुन मिरवणूक काढण्यात आली. सोनवद धरणाचे शिल्पकार माजी आमदार रंगराव माधवराव पाटील यांच्या स्मृतीस लोकनियुक्त सरपंच शैलजा किशोर पाटील व उपसरपंच सुरेश देविदास कोळी सह सर्व सदस्य व पदाधिकारी यांनी अभिवादन केले. सदर ग्रामपंचायतीवर सत्ता काबीज करित यशस्वीतेसाठी पॅनल प्रमुख कृउबा चे संचालक किशोर रंगराव पाटील, सेवा सोसायटी चेअरमन किशोर मधुकर ठाकरे, लक्ष्मण पांडुरंग येळवे, शामकांत धडाजी पवार, भालचंद्र पुना येळवे, चंद्रकांत पितांबर ठाकरे, रविंद्र विनायक अहिरे, राजेंद्र जहागीरदार नारवडे, संजय काशिनाथ अहिरे, अमित जुम्मा पिंजारी, सुरेश हिम्मतराव मालचे, दिपक सुरेश अहिरे,लक्ष्मण दशरथ मालचे (माजी सरपंच), प्रमोद प्रकाश ठाकरे, दिपक लोटन माळी, विनोद अलिंगराव वानखेडे, बारकु यशवंत वानखेडे, तुषार कैलास अहिरे, रोहिदास अमृत वानखेडे, शानाभाऊ गुलाब ठाकरे, शरद दिलीप वानखेडे, निलेश युवराज वानखेडे, शालीक साहेबराव ठाकरे, कैलास कौतिक माळी, देवेंद्र हिलाल ठाकरे, संजय रावण बेहरे यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# कर्करोग विरुद्धच्या लढ्यात सामील व्हा : रक्त विकार तज्ञ डॉ.निलेश वासेकर यांचे आवाहन

**नाशिक । प्रतिनिधी**




ब्लड कॅन्सरच्या रुग्णांना सर्वोत्तम आणि वैयक्तिकृत कॅन्सर उपचार देण्यासाठी इंदिरानगर, नाशिक येथील अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलने रुग्णांसाठी रक्ताच्या संबंधित कर्करोग आणि त्यावरील उपचार यासह नवीन अत्याधुनिक रक्त कर्करोग निदान व उपचार सेवा सुरू केलेल्या आहेत. अशी माहिती पत्रकारांशी संवाद साधताना रक्त विकार तज्ञ डॉ. निलेश वासेकर यांनी काल दिली. यादरम्यान त्यांनी कर्करोग विरुद्धच्या लढ्यात सामील व्हा असे आवाहनही केले.

डॉ.निलेश वासेकर म्हणाले, रक्ताच्या संभंधित कर्करोगने ग्रस्त असलेल्या रुग्णांसाठी परवडणाऱ्या दरात वैयक्तिक आणि रुग्ण-केंद्रित काळजी प्रदान करता येते. आमचे अत्यंत कुशल हेमॅटॉ-ऑन्कोलॉजिस्ट आमच्या रुग्णांना सर्वोत्तम उपचार सेवा देण्यासाठी सर्वात प्रगत तंत्रे आणि तंत्रज्ञान वापरण्यास वचनबद्ध आहेत. पुढे ते म्हणाले, गेल्या वर्षभरात २० कर्करोग ग्रस्त रुग्णांवर यशस्वीरित्या अस्थी मज्जा प्रत्यारोपण करण्यात आले. तसेच अक्युट लिम्फोब्लास्टिक ल्युकेमिया या आजाराने ग्रस्त २५ रुग्णावर केमोथेरेपीद्वारे तर लिम्फोमा आणि मायेलोमा या आजाराने प्रभावित २५-३० रुग्णावर यशस्वी उपचार करण्यात आले असून त्यांच्या प्रकृतीमध्ये दैनंदिन भेटी दरम्यान सुधारणा दिसून आली आहे. वर्षभरात जवळपास १०० पेक्षा जास्त बोन मॅरो प्रोसिजर करण्यात आल्या आहेत. ऍनिमिया बाधित १००० पेक्ष्या जास्त रुग्णांवर यशस्वी उपचार करण्यात आले आहेत. पत्रकार परिषेदत अधिक माहिती देतांना रक्त विकार तज्ञ डॉ सुदर्शन पंडित म्हणाले कि, रक्ताच्या कर्करोगामुळे रक्तपेशींच्या कार्यात अडथळा निर्माण होतो. याची सुरुवात बोन मॅरोमध्ये होते. अशी माहिती पत्रकारांशी संवाद साधताना रक्त विकार तज्ञ डॉ. निलेश वासेकर यांनी काल दिली. यादरम्यान त्यांनी कर्करोग विरुद्धच्या लढ्यात सामील व्हा असे आवाहनही केले.

# जय गुरुदत्त नागरी सहकारी पतसंस्थेच्या स्विकृत संचालकपदी जयप्रकाश मुथा, अजित ताडगे

**पंचवटी । प्रतिनिधी**



पेठ रोड, दत्तनगर येथील जय गुरुदत्त नागरी सहकारी पतसंस्थेच्या स्विकृत संचालकपदी जयप्रकाश मुथा व अजित ताडगे यांची एकमताने निवड झाली आहे. तसेच कार्यकारी संचालक म्हणुन उत्तमराव उगले तसेच जनसंपर्क संचालक म्हणुन जयप्रकाश मुथा यांची एकमताने निवड करण्यात आली.

२४ वर्षांपुर्वी दि.१८ नोव्हेंबर १९९९ रोजी पेठ रोड, दत्तनगर येथे स्थापन झालेल्या पतसंस्थेचे सुरुवातीचे भागभांडवल ५० हजार रुपये होते. त्यावेळी छोट्याशा भाडेतत्त्वावरील जागेत पतसंस्थेचे कामकाज सुरू झाले होते. आजमितीस पतसंस्थेत ६ कोटी २५ लाख ठेवी, ४ कोटी ९० लाख कर्जवाटप,२ कोटी ५० लाख गुंतवणुक, ४५ लाख रुपये भागभांडवल असून पतसंस्था सुस्थितीत कार्यरत आहे. सदर निवडीप्रसंगी पतसंस्थेचे संस्थापक व विद्यमान अध्यक्ष सुनिल केदार, उपाध्यक्ष प्रकाश बोधवडे, संस्थापक अध्यक्ष व माजी कार्यकारी संचालक उत्तमराव उगले, जनसंपर्क संचालक जयप्रकाश मुथा, रमाकांत उर्फ बाळासाहेब वाघमारे, खंडू बोडके, किशोर ढगे, रंजना काकड, पद्माकर पाटील, संजय घुगे, राजेंद्र काटकर, मंगला कोठूळे, अजित ताडगे आदींसह मुख्य व्यवस्थापक शिरीष जोंधळे, वसुली अधिकारी किशोर कुऱ्हे, कर्मचारी संभाजी पवार, अंकित धात्रक, प्रकाश जाधव आदी उपस्थित होते.

### कसारा घाटात पिकअप दरीत कोसळली

**नाशिक ।** मुंबई महामार्गावरील कसारा घाटातील घाटनदेवी मंदिरासमोर असलेल्या उंट दरीत मध्यरात्री साडेबारा वाजेच्या सुमारास घोटीहून मुबंईकडे भाजीपाला घेऊन जाणाऱ्या पिकअप टेम्पो चालकाचे गाडी वरील नियंत्रण सुटल्याने पिकअप टेम्पो चालकासह ४०० फुट खोल दरीत कोसळल्याने झालेल्या अपघातात टेम्पो चालकाचा मृत्यू झाला. या अपघाताची माहिती महामार्ग पोलीस सुनील खताळ यांना समजताच त्यांनी इगतपुरी पोलीस कसारा पोलीस ठाण्याला कळवून घटनास्थळ गाठले. त्यावेळी गाडी थेट दरीत गेल्याची खात्री पटल्यावर महामार्ग पोलिसांनी कसारा येथील आपत्ती व्यवस्थापन टीमचे शाम धुमाळ यांना माहिती देत मदतीसाठी बोलवले.

# साळवे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी पुनम आखडमल यांची बिनविरोध निवड

**चिमठाणे । प्रतिनिधी**



तालुक्यातील साळवे ग्रामपंचायत कार्यालय येथे सर्वसाधारण सभा लोकनियुक्त सरपंच उषाबाई संतोष वाघ यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. त्यात ग्रामविकास पॅनलच्या पुनम रविंद्र आखडमल यांची बिनविरोध उपसरपंच पदी निवड करण्यात आली. हयावेळी प्रशासक ग्रा. पं.विभाग विस्तार अधिकारी पंचायत समिती चे कपिल वाघ यांच्या कडे असलेला पदभार लोकनियुक्त सरपंच उषाबाई वाघ यांच्या कडे सोपविण्यात आला.

उपसरपंच पदासाठी अर्ज भरण्यासाठी वेळ दिला त्यात निर्धारित वेळेत ग्रामविकास पॅनल च्या सदस्यां पुनम रविंद्र आखडमल यांनी अर्ज दाखल केला. तर विरोधी गटातर्फे एकही अर्ज दाखल झाला नाही. एकुण नऊ पैकी पाच सदस्य ग्रामविकास पॅनलचे निवडुन आले होते. दुपारी दोन वाजता ग्रामपंचायत कार्यालयात लोकनियुक्त सरपंच उषाबाई संतोष वाघ यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेण्यात आली. सभेचे इतिवृत्त ग्रामसेवक विश्र्वनाथ बोरसे यांनी वाचुन दाखविले. उपसरपंच पदासाठी एकमेव अर्ज दाखल झाल्याने पुनम रविंद्र आखडमल यांची बिनविरोध निवड घोषित केली. सभेला सदस्य नवल राजाराम जाधव, पुष्पाबाई पुंडलिक बोरसे, उषाबाई भिमराव भारती, लाडकीबाई भगवान पिंपळे उपस्थित होते तर विरोधी गटाचे चार सदस्य सभेच्या अगोदर सही करून निघुन गेल्याने सभेला गैरहजर होते. त्यानंतर सत्ताधाऱ्यांनी जल्लोष केला. ग्रामविकास पॅनल चे पं.स.सदस्य पंडित डिगंबर बोरसे, माजी पं. स.उपसभापती देविदास मंसाराम जाधव , प्रकाश पंडित बोरसे ,संतोष भगवान वाघ, सेवा सोसायटी चेअरमन दिलीप गजेंद्र भारती, पेडकाई देवी ट्रस्टचे चेअरमन भगवानसिंग सत्तरसिंग गिरासे, हिरालाल लोटन पाटील, किरण भोगिलाल भारती, नागोसिंग चंद्रसिंग गिरासे, हिरालाल भिवसन बोरसे, देविदास कौतिक वाघ, जिजाबराव जयराम भारती, डिगंबर सिताराम कोळी, गोरख तिरसिंग गिरासे, भुपेंद्र नारायणसिंग गिरासे , आधार धाकु पाटील, महादु भिवसन पाटील, कैलास हिम्मत बोरसे, संजय मोहन बोरसे, शिवाजी चिंतामण जाधव, समाधान राजेंद्र जाधव, सचिन अशोक जाधव, खुमान मिठेसिंग वाघ, राहुल रामकृष्ण बडगुजर, निलेश राजेंद्र पाटील, कैलास उखडु पाटील, धनराज भावराव पाटील, किशोर साहेबराव ठाकरे, आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# होळनांथे येथील विज्ञान प्रदर्शन संपन्न

**शिरपूर । प्रतिनिधी**



तालुक्यातील होळनांथे येथील आर.सी. पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात ८ डिसेंबर रोजी विद्यालयातील इयत्ता ५ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी विज्ञान प्रदर्शन संपन्न झाले.


सदर प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पक बुद्धीला चालना देऊन, वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून, भविष्याचे वेध घेणारी शेती, माहिती संप्रेषण तंत्रज्ञान, कृषी, वैद्यकीय, औद्योगिक क्षेत्रावर आधारित उपकरणांची निर्मिती केली. सदर विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी एकूण ५० उपकरणांची मांडणी केली. विज्ञान प्रदर्शनाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सदर विज्ञान प्रदर्शनातून मोठ्या गटाची तीन उपकरणे व लहान गटातील तीन उपकरणांची निवड करण्यात आली.

मोठ्या गटात प्रथम शेटे तुषार दिलीप, द्वितीय विसपुते दर्शन घनश्याम, तृतीय रणदिवे प्रज्ञा सुरेश व लहान गटात प्रथम पटेल विमला रणछोडदास, द्वितीय पाटील खुशाल अविनाश, तृतीय कोळी उमेश मोतीलाल यांनी यश संपादन केले. सुरुवातीला विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य व्ही.आर.सुतार यांनी केले.

कार्यक्रम प्रसंगी ज्येष्ठ शिक्षक श्री अहिरे, श्री मासरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विज्ञान शिक्षक आर.आर.महाजन यांनी केले. आभार एस.के. पावरा यांनी मानले. विज्ञान प्रदर्शन परीक्षणाचे काम ज्युनिअर कॉलेजचे प्रा. सागर वारुळे व कु. जागृती जाधव यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डी. के. चौधरी, एस. बी. तावडे, सोनाली पाटील, के. पी. पाटील, अमोल शिंदे, राहुल चौधरी, श्रीमती कापडणे, श्रीमती जया धनगर, कु. वृषाली कासार, पी.डी.शिरसाठ व सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

# राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत ऋतुजाची उत्कृष्ट कामगिरी

**नाशिक । प्रतिनिधी**



२ डिसेंबर दिल्ली येथे झालेल्या ६६ व्या राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत मविप्रच्या केटीएचएम महाविद्यालयातील बीबीएची विद्यार्थिनी ऋतुजा संतोष गवळी हिने १० मीटर एअर रायफल या क्रीडा प्रकारात सहभाग नोंदवत भारतीय नेमबाजी संघाच्या निवड चाचणीसाठी पात्र झाली.

ऋतुजाने या स्पर्धेत ६१२.५ गुणांची कमाई केली. या स्पर्धेत भारतातील १२०० महिला खेळाडू सहभागी झाल्या होत्या. १५ जानेवारी ते २५ जानेवारी २०२४ रोजी दिल्ली येथील डॉ.करण सिंग शुटिंग रेंज येथे होणाऱ्या भारतीय संघ निवड चाचणीसाठी ऋतुजा पात्र झाली आहे. तिला नेमबाजी प्रशिक्षक स्वप्निल पडोळे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल तिचा संस्थेचे सरचिटणीस ॲड.नितीन ठाकरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# सावळदे येथील पटेल माध्यमिक विद्यालयात शिक्षण परिषद संपन्न

**शिरपूर । प्रतिनिधी**



तालुक्यातील सावळदे येथील आर.सी.पटेल माध्यमिक विद्यालयात सावळदे केंद्र अंतर्गत शिक्षण परिषद पुष्प ६ वे संपन्न झाले. सुरुवातीस मान्यवरांनी सरस्वती पूजन करून उद्घाटन केले. यावेळी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

या परिषदेच्या स्वागत समारंभ अध्यक्षस्थानी गावाचे सरपंच अनिल दोरीक होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सावळदे गावाचे उपसरपंच सचिन राजपूत, गटाचे केंद्रप्रमुख वसंत कोळी, केंद्र शाळेचे मुख्याध्यापक श्री. तमखाने सर, मुख्याध्यापिका सौ.एन.पी.देवरे उपस्थित होते.

सुरुवातीस मान्यवरांनी सरस्वती पूजन करून उद्घाटन केले. नंतर विद्यालयाच्या वतीने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ.एन.पी. देवरे यांनी प्रास्ताविक केले. परिषदेसाठी सावळदे केंद्र अंतर्गत सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक तसेच शिक्षक बंधू, भगिनी उपस्थित होते. यावेळी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एम.एल.जाधव यांनी तर आभार ए.बी.निळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक बंधू, भगिनी व कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

# कांदा निर्यात बंदी तत्काळ हटविण्यासाठी शेतकरी देणार दिल्लीत धडक- दिघोळे

### महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचा निर्णय

**नाशिक । प्रतिनिधी**



केंद्र सरकारने कांद्यावर ७ डिसेंबर रोजी अर्ध्या रात्री कांदा निर्यातबंदी लागू केल्यामुळे कांद्याच्या दरात निम्म्यापेक्षा अधिक घसरण झाल्याने एका दिवसात शेतकऱ्यांचे कोट्यवधीचे नुकसान झाले आहे. त्यामुळे ही कांदा निर्यात बंदी तात्काळ हटवावी यासाठी महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकरी दिल्लीत जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय वाणिज्यमंत्री पियुष गोयल, गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेणार आहेत. तसेच कांदा निर्यात बंदी तत्काळ हटवण्याची मागणी केली जाईल. असा ठराव काल देशवंडी, ता. सिन्नर, जि. नाशिक येथे झालेल्या कांदा उत्पादक शेतकरी संघटनेच्या बैठकीत करण्यात आला आहे.

या बैठकीत एकूण तीन ठराव करण्यात आले असून महाराष्ट्रातील सर्व कांदा उत्पादकांनी यासाठी कांदा उत्पादन संघटनेला साथ द्यावी असे आवाहन कांदा संघटनेचे अध्यक्ष भारत दिघोळे यांनी केले आहे. अवकाळी पाऊस, गारपिटीने आधीच कांदा शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या कांद्याला थोडासा अधिकचा दर मिळण्यास सुरुवात झाली आणि केंद्र सरकारने तत्काळ कांद्यावर निर्यातबंदी केली. त्यामुळे केवळ एका दिवसात कांद्याच्या बाजारभावात कमीत-कमी दोन हजार रुपये प्रति क्विंटलने घसरण झाली. त्यामुळे राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे कोट्यवधीचे नुकसान झाले आहे. आधीच चाळीस टक्के कांदा निर्यात शुल्क व त्यानंतर आठशे डॉलर किमान निर्यात मूल्य लागू करून गेल्या चार, साडेचार महिन्यांपासून कांद्याचे बाजारभाव नियंत्रणात ठेवण्याचे काम केंद्र सरकारकडून केले गेले. तेव्हाही शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झालेले आहे. चाळींमध्ये साठवलेल्या कांद्याला दर मिळण्यास सुरुवात झाली त्यावेळेसही नाफेड आणि एनसीसीफने घेतलेला बफर स्टॉक मधील कांदा देशातील विविध राज्यांतील बाजारामध्ये स्वस्तात विक्री करून केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या कांद्याचे भाव पाडले गेले होते. सत्ताधारी असो किंवा विरोधक असो कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या पाठीशी कोणीही खंबीरपणे उभे राहत नाही. आता महाराष्ट्रातील कोणत्याही बाजार समितीत प्रतिक्विंटल तीन हजार रुपये पेक्षा कमी दराने लिलावात बोली लागल्यास कांदा उत्पादक शेतकरी हे कांद्याचा झालेला लिलाव रद्द करतील आणि कोणीही शेतकरी व्यापाऱ्यांना तीन हजार पेक्षा कमी दरात कांदा देणार नाही असे तीन महत्त्वाचे ठराव काल देशवंडी येथील कांदा उत्पादक शेतकरी संघटनेच्या बैठकीत करण्यात आले आले आहे. महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेच्या बैठकीसाठी यावेळी मोठ्या संख्येने देशवंडी, जायगाव, वडझिरे, नायगाव येथील कांदा उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

# हर्षल रोकडे याची राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड



**शिरपूर । प्रतिनिधी**

शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर.सी.पटेल इंग्रजी माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी हर्षल राजेंद्र रोकडे या विद्यार्थ्याची राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवडझाली आहे. लातुर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत निवड झाली. संस्थेचे अध्यक्ष माजी शालेय शिक्षण मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उद्योगपती चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव प्रभाकरराव चव्हाण, स्कूल कमिटी चेअरमन योगेशभाऊ भंडारी, डॉ. उमेश शर्मा, पी.व्ही. पाटील, प्राचार्य डॉ. अमोल परब यांनी त्याचे कौतुक केले.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक
रविवार दि. १० डिसेंबर २०२३




# सरसकट कुणबी प्रमाणपत्र दिलं तर राज्यात मराठाच शिल्लक राहणार नाही- मंत्री भुजबळ

## मराठा समाजाला आमचा विरोध नाही, आमचा विरोध झुंडशाहीला आणि दादागिरीला आहे



















इंदापूर ।

विकसित मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी आमचा विरोध नाही, त्यांना स्वतंत्र आरक्षण द्या, ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लावू नका, आम्ही एवढंच मागतोय. परंतु कुणी दादागिरीची भाषा करत असेल तर आम्ही देखील दादागिरीने उत्तर देऊ असे सांगत मंडलच्या वेळी देखील सर्व एकत्र येऊन लढले होते. आताही ओबीसींच आरक्षण वाचविण्यासाठी सर्व पक्षातील नेत्यांनी पुढं यायला हवं असे आवाहन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले. काल इंदापूर येथे राज्यभरातील ओबीसी नेत्यांच्या उपस्थितीत भटके विमुक्त ओबीसी आरक्षण बचाव एल्गार मेळावा पार पडला. यावेळी ते बोलत होते. या मेळाव्यास बहुसंख्येने ओबीसी बांधव उपस्थित होते. यावेळी प्रकाश शेंडगे, माजी मंत्री आ.महादेव जानकर, आ. गोपीचंद पडळकर, भटक्या विमुक्तांचे नेते प्रा.लक्ष्मण गायकवाड, मुस्लिम ओबीसी संघाचे शब्बीर अन्सारी, प्रा.टी.पी.मुंडे, आगरी नेते प्रा. राजाराम पाटील, माजी खासदार समीर भुजबळ, रामोशी समाजाचे नेते दौलत शितोळे, इतर मागासवर्ग आयोगाचे माजी सदस्य प्रा.लक्ष्मण हाके, नाभिक समाजाचे नेते कल्याण दळे, आयोजक ॲड.कृष्णाजी यादव, पांडुरंग शिंदे यांच्यासह सकल ओबीसी, भटके विमुक्त जाती, एसबीसी आणि अल्पसंख्याक समाज व इंदापूर येथील पदाधिकारी व ओबीसी बांधव लाखोंच्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, महाराष्ट्रात अशांतता निर्माण करण्याचं काम करतोय असे लोक म्हणतात. त्यांना सांगायचं आहे की, त्यांच्या पंधरा सभा झाल्यानंतर आम्ही 'सौ सोनार की एक लोहार की' म्हणून एक सभा घेऊन आमची भुमिका मांडत आहोत. अशावेळी मात्र त्यांना कायद्यात सुट दिली जातेय. त्यांना कायदा वेगळा लावला जातोय त्यावर कुणीही बोलायला तयार नाही. त्यांना कायद्याची सुट आणि आम्हाला मात्र कायदा लावला जातोय अस दिसतंय. त्यामुळे राज्यात अशांतता कोण निर्माण करतंय याचा सर्वांनी अभ्यास करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच मोठ नुकसान झालं. तेथील शेतकऱ्यांनी मला फोन केला की तुम्ही बघायला या. त्यावेळी मी पाहणीस गेलो. तीन लाखांच्या मतदारसंघात तीस लोक गो बॅकचे बोर्ड घेऊन पुढे आले. अगदी सगळ्या ठिकाणी तेच होते. त्यानंतर मी ज्या रस्त्यांनी गेलो ते रस्ते आम्ही शुद्र आहोत म्हणून गोमुत्र टाकून साफ केलं. मग आम्ही जर शुद्र असू तर प्रमाणपत्र घेऊन शुद्र का होताय? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तसेच बिहार सारखे राज्य जातनिहाय जनगणना करू शकते मग महाराष्ट्र का करू शकत नाही. महाराष्ट्रात देखील जात निहाय जनगणना करायला हवी. शिंदे आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती शिंदे जी भूमिका घेत आहे त्याला आपला विरोध असून गेल्या दोन महिन्यात देण्यात आलेले कुणबी दाखले रद्द करावे. ओबीसी आरक्षणाला धक्का लाऊ नये अशा मागण्या त्यांनी यावेळी केल्या.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक
रविवार दि. १० डिसेंबर २०२३





# धुळ्यातील अवधान परिसरात असलेली दोन प्लायवुडचे दुकाने फोडले

## सहा लाखांची रोकड लंपास : व्यापार्यांमध्ये घबराट















धुळे।
शहरातील मोहाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत आज पहाटे चोरट्यांनी धुमाकुळ घातला. अवधान परिसरात असलेली दोन प्लायवुडच्या दुकानांसह याच परिसरातील एक दुकान फोडले. यात बालाजी प्लायवूड दुकानातील ड्राव्हरमध्ये ठेवलेली सहा लाखांची रोकड चोरट्यांनी लंपास केली. तर अन्य दोन घटनांमध्ये चोरट्यांच्या हाती निराशा आली. बालाजी प्लायवुडमधील चोरीची घटना सीसीटिव्हीत कैद झाली आहे. याप्रकरणी दुपारी उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते. मोहाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अवधान शिवारात असलेल्या बालाजी प्लायवूडला रात्री पाऊण वाजेच्या सुमारास लक्ष्य केले. येथील वॉचमन गाढ झोपेत असल्याची संधी चोरट्यांनी साधली. चोरट्यांनी दुकानाच्या एकाच बाजुला लावलेले कुलूप तोडले तसेच शटर उचकटून आत प्रवेश केला व दुकानाच्या ड्राव्हरमध्ये ठेवलेली सहा लाखांची रोकड लंपास केली. यासंदर्भात दुपारी उशिरापर्यंत मोहाडी नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते. चोरट्यांनी ओळख पटू नये याकरीता तोंडाला रूमाल बांधलेला दिसून येत आहे. घटनास्थळावर यांनी दिली भेट सदर घटना दुकान मालक नितीन पिंगळे यांना माहिती होताच त्यांनी मोहाडी पोलीस स्टेशनला संपर्क साधला.

संकलन : दिपक वाघ